सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २३ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ऑपरेशन सिंदूर- लोकसभेत २८ राज्यसभेत २९ जुलैला चर्चा

### दोन्ही सभागृहांत १६-१६ तास होणार चर्चा; विरोधकांचा ३ दिवसांपासून कामकाजाच्या वेळी गदारोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात भाग घेतल्यानंतर बाहेर पडलेल्या राहुल गांधींनी बुधवारी ऑपरेशन सिंदूरवर केंद्र सरकारला प्रश्न विचारले. राहुल म्हणाले- सरकार म्हणते की ऑपरेशन सिंदूर सुरू आहे, तर डोनाल्ड ट्रम्प यांनी ते थांबवण्याचा दावा केला आहे.

ट्रम्प यांनी २५ वेळा सांगितले की त्यांनी युद्धबंदी पूर्ण केली. ते कोण आहे असे म्हणणारे, ते त्यांचे काम नाही. पण पंतप्रधान मोदींनी यावर एकही उत्तर दिले नाही.




काहीतरी गोंधळ आहे असे दिसते.

तत्पूर्वी, बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावरून लोकसभेत गोंधळ झाला. विरोधी पक्षाचे खासदार घोषणाबाजी करत वेलमध्ये आले. त्यांनी काळे कपडे फडकावले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले.

अध्यक्षांनी विरोधी खासदारांना घोषणाबाजी करण्यास मनाई केली आणि म्हणाले- तुम्ही संसदेत रस्त्यावर असल्यासारखे वागू नका. देशातील नागरिक तुमच्याकडे पाहत आहेत. लोकसभेचे कामकाज २० मिनिटे चालले, प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत, नंतर दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

#### भारतात निवडणुका चोरल्या जातात



महाराष्ट्रात मॅच फिक्सिंग कसे होते हे आम्ही सर्वांना दाखवून दिले. आम्ही कर्नाटकातील एका लोकसभा जागेची चौकशी केली - तिथे मोठ्या प्रमाणात मतांची चोरी आढळली, लवकरच ते जनतेसमोर आणू.

बिहारमध्ये एसआयआरच्या नावाखाली एससी, एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्याक बंधू-भगिनींची मते चोरली जात आहेत. आम्ही गप्प बसणार नाही. संसदेपासून रस्त्यांपर्यंत इंडिया आघाडी लोकांच्या हक्कांसाठी लढाई लढेल.

**खा.राहुल गांधी**

## ऑगस्ट अखेरीस उपराष्ट्रपती पद निवडणुकीची शक्यता

### आयोगाने सांगितले- तयारी झाली सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

ऑगस्टच्या अखेरीस देशाला नवीन उपराष्ट्रपती मिळू शकतात. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पुढील ७२ तासांत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. निवडणूक आयोगाने बुधवारी सांगितले की, निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. सर्व तयारी पूर्ण झाल्यावर निवडणुकीची अधिकृत घोषणा केली जाईल.

घटनेच्या कलम ३२४ अंतर्गत उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे.



जगदीप धनखड यांनी २१ जुलैच्या रात्री अचानक देशाच्या १४ व्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला.

दुसऱ्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. ७४ वर्षीय धनखड यांचा कार्यकाळ १० ऑगस्ट २०२७ पर्यंत होता.

२१ जुलैच्या रात्री जगदीप धनखड यांनी कलम ६७(अ) अंतर्गत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा सादर केला होता. त्यांनी लिहिले होते- आरोग्याला प्राधान्य देऊन आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करून, मी भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा तात्काळ राजीनामा देत आहे.पत्रात त्यांनी राष्ट्रपतींचे सहकार्य आणि सौहार्दपूर्ण संबंधांबद्दल आभार मानले. तसेच पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचे सहकार्याबद्दल आभार मानले.

## अजित पवारांच्या शिलेदाराला मध्यरात्री बेड्या, लातूरमधील मारहाण भोवली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३लातूर**

लातूरमध्ये छावा संघटनेच्या विजय घाडगे यांना मारहाण केल्याप्रकरणी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सूरज चव्हाण यांच्यासह १० जणांना अटक करण्यात आली आहे. लातूरमध्ये गेल्या आठवड्यात सुनील तटकरे यांच्यासमोरच छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण करण्यात आली होती. त्याचे पडसाद राज्यात उमटले होते. अजित पवार यांनी सूरज चव्हाण याच्याकडून पदाचा राजीनामाही घेतला होता. आता लातूरमध्ये सूरज चव्हाण यांच्यासह १० जणांना अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री सुरज चव्हाण पोलिसांना शरण आले आहेत. पोलिसांकडून



कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून अटक करण्यात आली आहे.

छावाचे विजय घाडगे मारहाण प्रकरणातील राष्ट्रवादीचे सुरज चव्हाण यांच्यासह १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांचा राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सुरज चव्हाण आणि काही कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता.

दरम्यान या हल्लयात विजयकुमार घाडगे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर सध्या लातूरमधील रूग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरज चव्हाण यांच्यासह ११जणांवर लातूरच्या विवेकानंद पोलीस ठाणे गुन्हे दाखल आहे. सुरज चव्हाण यांच्यासह १० आरोपी पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती समोर येत आहे.

## विमान अपघातानंतर ब्रिटनमधल्या कुटुंबांना पाठवले दुसऱ्यांचेच मृतदेह; अनेकांनी अंत्यसंस्कारही केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अहमदाबाद**

अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघाताने संपूर्ण देशाला हादरवरुन सोडलं. १२ जून रोजी, एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ विमानान अहमदाबादहून गॅटविक लंडनसाठी उड्डाण केल्यानंतर काही वेळातच एका इमारतीवर कोसळले. या अपघातात २६० लोकांचा मृत्यू झाला, ज्यात विमानात २४२ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा समावेश होता. मृतांमध्ये परदेशातील नागरिकांचाही समावेश होता. या विमान दुर्घटनेला महिना उलटला असून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. एअर इंडिया अपघातातील मृतांचे चुकीचे मृतदेह ब्रिटनमधील कुटुंबांना पोहोचले आहेत.

अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात दोन वैमानिक, १० क्रू



सदस्य आणि २३२ प्रवासी असे एकूण २४२ लोक विमानात होते. त्यापैकी १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश, १ कॅनडा आणि पोर्तुगालचे ७ नागरिक होते. यापैकी २४१ जणांचा जागीच मृत्यू झाला होता. विमान कोसळ्यानंतर मोठ्या प्रमाणात इंधनाने पेट घेतल्यामुळे प्रवाशांचा जागीच कोळसा झाला. त्यामुळे मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचण्या करण्यात आल्या. त्यानंतर मृतदेह कुटुंबियांकडे सोपवण्यात आले होते. मात्र आता ब्रिटनमधील दोन कुटुंबांना चुकीचे मृतदेह पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडिया एआय-१७१ विमान अपघातानंतर, मृतदेहांची ओळख पटवून कुटुंबियांना देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. पण एक मोठी चूक समोर आली आहे. ब्रिटिश माध्यमांनुसार, ब्रिटनमधील दोन कुटुंबांना विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ब्रिटिश नागरिकांऐवजी चुकीच्या मृतदेहांचे अवयव पाठवण्यात आले आहेत.

हा प्रकार समोर आल्यानंतर कुटुंबियांनी अंत्यसंस्कार थांबवले आणि चौकशीची मागणी केली. इनर वेस्ट लंडनच्या कोरोनर डॉ. फियोना विल्कॉक्स यांनी डीएनए चाचणीद्वारे मृतदेहांची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला तेव्हा ही चूक उघडकीस आली. अपघातानंतर, ब्रिटिश नागरिकांचे कुटुंबिय भारतात आले होते आणि त्यांनी मृतदेह मिळविण्यासाठी डीएनएचे नमुने दिले. त्यानंतर, भारतातून डीएनए चाचणी केल्यानंतर मृतदेह ब्रिटिश कुटुंबांना सोपवण्यात आले. मा लंडनमध्ये पुन्हा एकदा डीएनए चाचणी केल्यानंतर चूक पकडली गेली.

या प्रकारामुळे इतर मृतदेहांची ओळख पटवण्यात चुका झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे बहुतेक मृतदेहांवर त्यांच्या नातेवाईकांनी अंत्यसंस्कार केले आहेत. ब्रिटनमधील कुटुंबियांचे म्हणणे आहे की अहमदाबादच्या सिव्हिल हॉस्पिटलमधून मृतदेह शवपेटी आणि प्लास्टिकच्या कंटेनरमध्ये देण्यात आले होते. मृतदेहांच्या कंटेनरवर लेबल्स चिकटवले होते, ज्यावर नावे लिहिलेली होती. मृतदेह जास्त जळाल्यामुळे, नातेवाईकांना कंटेनर किंवा शवपेट्या उघडण्यास मनाई केली होती.

दरम्यान, ब्रिटनमधील पीडित कुटुंबांनी त्यांच्या खासदारांशी, परराष्ट्र कार्यालयाशी, पंतप्रधानांशी आणि परराष्ट्र सचिवांच्या कार्यालयांशी संपर्क साधून एअर इंडियाला उत्तर मागितलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिटन दौऱ्यादरम्यान पंतप्रधान केयर स्टारमर या प्रकरणी थेट चर्चा करतील असं म्हटलं जात आहे. या सगळ्या प्रकारामुळे ब्रिटिश कुटुंबांमध्ये नाराजी आहे.

## माणिकराव कोकाटेंची खुर्ची जाणार? पडद्यामागे हालचाली अन् विचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत होते. परंतु, शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कोकाटेंचा विधिमंडळात रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल केला. यानंतर राज्याच्या राजकारणात वादळ उठलं. ठिकठिकाणी आंदोलने झाली. अजित पवार गटाच्या नेत्यांसमोर पत्ते उधळण्यात आले. सत्ताधाऱ्यांनीही या प्रकारावर नाराजी व्यक्त केली.



कोकाटे यांनी राजीनामा देण्याची मागणी विरोधी पक्षांनी सुरू केली आहे. मात्र मी कोणत्याही परिस्थितीत राजीनामा देणार नाही असे मंत्री कोकाटे यांनी ठणकावून सांगितले आहे. या सगळ्या घडामोडी घडल्यानंतर आता कोकाटेंची खुर्ची जाणार अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. यात किती तथ्य आहे याचा अंदाज येत नाही. मात्र सूत्रांकडील माहितीनुसार कोकाटे यांचे कृषी खाते मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांना दिले जाण्याची शक्यता आहे. कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून घेण्याचा विचार वरिष्ठ पातळीवर सुरू झाला आहे. दरम्यान, माणिकरावांना आता आणखी पाठिशी घालायचे नाही असे राष्ट्रवादीत ठरल्याची माहिती आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मानले शरद पवार,उद्धव ठाकरेंचे आभार

**विदत्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे आभार मानले आहेत. महाराष्ट्र नायक या कॉफी टेबल बुकमध्ये फडणवीसांचं कौतुक करणारी प्रतिक्रिया या दोन्ही नेत्यांनी दिली होती. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी फडणवीसांच्या ५५ व्या वाढदिवशी महाराष्ट्र नायक नावाचे एक कॉफी टेबल बुक प्रकाशित केले. त्यात उद्धव ठाकरे यांच्या प्रतिक्रियेने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. काही दिवसांपूर्वी फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना सोबत आल्यास विचार करू असं म्हटले होते. त्यात उद्धव ठाकरेंनी



देवेंद्र फडणवीसांची प्रशंसा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले. फडणवीसांनीही आम्ही शत्रू नाही, वैचारिक विरोधक आहोत असं सांगत उद्धव ठाकरेंचे आभार मानले आहेत.

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी केलेल्या कौतुकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावेळी ते म्हणाले की, मी त्यांच्या शुभेच्छांसाठी आभारी आहे. महाराष्ट्रात आपण सगळे वैचारिक विरोधक आहोत. कुणीच कुणाचा शत्रू नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल मी आभार व्यक्त करतो. तर शरद पवारांचा मोठेपणा आहे. ते ज्येष्ठ नेते आहेत त्यांनी माझ्याबद्दल विधान करणे हे माझ्यासाठी अतिशय मोलाचं आहे

## प्रहार संघटनेचा उद्याला राज्यव्यापी रास्ता रोको

### बच्चू कडू हे स्वत: अमरावती शहर, अचलपूर, चांदूरबाजार मध्ये राहणार उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात उद्या सकाळपासून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात जोरदार रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येणार आहे.

या आंदोलनामागचे मुख्य कारण म्हणजे शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी,दिव्यांगांना दरमहा ६ हजार रुपये मानधन ही आहेत. मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे सरकारच्या आश्वासनांना उत्तर म्हणून रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा निर्णय घेतल्याचे बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं आहे.कर्जमाफीची तारीख जाहीर होईपर्यंत आंदोलन थांबणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.राज्य सरकारकडून निवडणुकीच्या काळात कोरे ७/१२ देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. आता मात्र उपाययोजना करत आहोत अशा प्रकारची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.



या आंदोलनाला मनसे, शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), तसेच विविध जाती-धर्मातील समाजबांधव व २५ हून अधिक आमदार व खासदारांचा सक्रिय पाठिंबा मिळाल्याची माहिती देण्यात आली आहे.

बच्चू कडू हे स्वत: अमरावती शहर, अचलपूर, चांदूरबाजार, लातूर, संभाजीनगर आदी ठिकाणी आंदोलनात सहभागी होणार आहेत.हे आंदोलन केवळ प्रहारचे किंवा बच्चू कडूंचे नसून, हे आंदोलन राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याचे आहे, असा संदेश या आंदोलनातून देण्यात येत आहे.

## महायुतीच्या महामंडळ जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला, भाजपला सर्वाधिक जागा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

महायुतीच्या महामंडळ जागावाटपाचा फॉर्म्युला अखेर निश्चित झाला आहे. सूत्रांनुसार, संख्याबळाच्या निकषावर भारतीय जनता पक्ष (भाजप), शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात महामंडळांचे वाटप होणार आहे. यात भाजपला सर्वाधिक ४४, शिंदे गटाला ३३, तर राष्ट्रवादी काँग्रेसला २३ महामंडळे मिळण्याची शक्यता आहे. मात्र, सिडको आणि म्हाडा या दोन महत्त्वाच्या महामंडळांवरून



भाजप आणि शिंदे गटात तीव्र रस्सीखेच सुरू आहे. दोन्ही पक्ष या महामंडळांवर दावा सांगत असून, याबाबत अंतिम निर्णय बाकी आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुती आपल्या नाराज आमदार आणि नेत्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करत आहे. या जागावाटपातून पक्षांतर्गत नाराजी कमी करून एकजुटीचं प्रदर्शन करण्याचा महायुतीचा मानस आहे. याशिवाय, महामंडळांच्या नियुक्त्या आणि अधिकारपदांवरूनही चर्चा तापली आहे. या फॉर्म्युल्यामुळे महायुतीच्या अंतर्गत समन्वय आणि राजकीय रणनीतीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. आता याची अंमलबजावणी कशी होते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## संपादकीय ......

# संत नामदेवांचे प्रबोधन कार्य

ज्ञानेश्वर समकालीन नामदेव हे महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ व श्रेष्ठ संत म्हणून मानले जातात. महाराष्ट्रातील संत परंपरा ही महाराष्ट्रातील संस्कृतीचे खरे वैभवच म्हणावे लागेल. रंजल्या-गांजलेल्यांची सेवा करून नित्याचे व्यवहार करीत असतानाच परमेश्वराचे चिंतन करावे. समाजात उच्च-नीच भाव नसावा. एका परमेश्वराची सर्व लेकरे मग विषमता कशासाठी, अशी भागवत धर्माची समतेची शिकवण या संत परंपरेने महाराष्ट्रात रुजविली. यामध्ये संत नामदेवांचे महाराष्ट्रातील अपूर्व कार्य सर्वश्रुतच आहे. त्यांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा आज (२३ जुलै) देशभरात साजरा होत आहे.

संत नामदेवांच्या कार्याचा, चरित्राचा अभ्यास करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उमटतात. त्यांच्या कार्याची महती फार मोठी आहे. नामदेवांचा जीवनपट, त्यांच्या अभंगाचे सौंदर्यग्रहण, लोककाव्य चरित्रकार नामदेव कुटकविता प्रतिमासृष्टी, नामदेवांची अमृतवचने, त्यांच्या कुटुंबीयांची कविता, नामदेवांचा मानवतावाद, पंजाबमधील प्रबोधन कार्य वगैरे महत्त्वाच्या गोष्टींचा परामर्श घेणे कठीण असले, तरी त्यांच्या कार्याचे संशोधन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुणे विद्यापीठातर्फे नामदेव अध्यापन समिती स्थापन केली आहे. ज्ञानदेव व नामदेव हे एकाच कालखंडातील असले, तरी ज्ञानदेवांनी अल्पवयात समाधी घेतल्याने त्यांच्या रूपानेच त्यांचे कार्य नामदेवांनी पुढे चालविले. सुमारे ८० वर्षांचे आयुष्य लाभल्याने त्यांना कार्य करण्यास भरपूर संधी प्राप्त झाली. संत नामदेवांनी आपले कार्य विशिष्ट जातीपुरते, समाजापुरते न करता अनेक जातीबांधवासाठी केले आहे.

ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर नामदेवांनी भागवत धर्माच्या प्रचारासाठी उत्तरेकडे प्रयाण केले. फार प्राचीन काळापासून मराठी माणसाला पंजाब प्रांताची ओढ आहे. पंजाब व महाराष्ट्र यांच्या मधील संबंध फार जुना आहे. नामदेवांनी बराच काळ गुजरात, माळवा संयुक्त प्रांतामध्ये परि मण करण्यात घालविला. पंजाबमधील धुमान येथे ते पंधरा वर्षे राहिले. या वास्तव्यात त्यांनी हिंदी पद्य रचना, अभंग रचना केली. शिखांचे धर्म संस्थापक गुरू नानकदेव कर्नाटकातील बिदर या गावी येऊन गेले होते. आजही त्या ठिकाणी गुरुनानक मंदिर आहे. संत नामदेव इ.स. १२७० ते १३५० या कालावधीत पंजाबमधील वास्तव्यास होते. पंजाबी भाषेत प्रसिद्ध झालेल्या 'जनमसारखी' या ग्रंथात हा उल्लेख मिळतो. नामदेव तीर्थ यात्रा करीत मथुरेतून द्वारकेत गेले. तिथून पंजाबमध्ये अमृतसर जिल्ह्यातील भटिंडा या गावी प्रथम गेले व त्या ठिकाणी त्यांची प्रशंसा झाली. या तीर्थ क्षेत्राच्या प्रवासामध्ये त्यांना जल्लो आणि लद्धा असे शिष्य मिळाले. त्यांच्या समवेत धुमान येथे ते स्थायिक झाले.

शिखांच्या 'गुरू ग्रंथसाहेब' या ग्रंथात संत नामदेवांची जी एकसष्ठ हिंदी पदे आहेत, त्यात एकूण १६ संत कवींच्या पदाचा समावेश आहे. त्रिलोचन, रामानंद, जयदेव, नामदेव, संत कबीर, रोहिदास, पीपा परमानंद, धला, साधना, नानक भीरनन फरीद, वेणी आणि सूरदास असे १६ संतकवी आहेत. संत नामदेवांची ६१ पदे ही 'बाबा नामदेवजीकी मुखवाणी' म्हणून पंजाबात ओळखली जातात. या पदातून नामेदवांनी पंढरीच्या विठ्ठलाचा पंजाबात सर्वप्रथम नामघोष केला आहे. 'जिकडे पाहे तिकडे अवघा विठोबा!' सर्व देहात आणि वस्तूत एक परमेश्वर निरंतर भरला आहे. दक्षिणेत भक्तीची गंगा निर्माण झाली. ती उत्तरेत नेण्याचे भगीरथ प्रयत्न संत नामदेवांनी केले. त्याचा ऋणानुबंध पंजाब आणि उत्तरेतील राज्यांनी जोपासावा. हिंदीमध्ये भक्त विचार परंपरेची सुरुवात प्रथम संत नामदेवांनी केली आणि ते दीपस्तंभासारखे उभे राहिले. पंजाबमध्ये 'गुरू ग्रंथसाहेब'इतकीच संत नामदेव यांच्यावर लोकांची श्रद्धा आहे.

# बॅटरी चलीत फवारणी पंपाबरोबरील 'हे' जुगाड करेल हुमणी किडीचा बंदोबस्त; जाणून घ्या सविस्तर




**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक** सामुहिक प्रयत्न कमी खर्चातील प्रकाश सापळे वापरल्यास अधिक परिणाम होऊन शेतकरी वर्गाचे होणारे संभाव्य नुकसान टळू शकते. त्यासाठी या सोप्या युक्तीचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे.

वळवाचा पहिला पाऊस चांगला झाल्यास सुप्तावस्थेत असलेले भुंगेरे सूर्यास्तानंतर बांधाशेजारच्या बाभूळ, कडुनिंब, चिंच, बोर आदी झाडांवर गोळा होतात.



भुंगेरे फक्त रात्रीच्या वेळी जमिनीतून वर मिलनासाठी बाहेर पडतात. मादी भुंगेरे अगोदर मातीबाहेर येतात. सूर्योदयापूर्वी ते परत जमिनीत जाऊन लपतात.

हुमणीच्या भुंगेऱ्यांना आकर्षित करण्यासाठी वापरण्यात येणारे सौरऊर्जा व विजेवर कार्यान्वित होणारे प्रकाशसापळे बाजारात उपलब्ध आहेत. त्यासाठी साधारणतः दीड हजार रुपये मोजावे लागतात.

**घरच्या घरी कसा बनवाल प्रकाश सापळा?** कमी खर्चात प्रकाश सापळा तयार करु शकतो.

यासाठी बॅटरी चलीत फवारणी पंप, १२ वॉटचा एलईडी बल्ब, होल्डर, रिकामी प्लॅस्टिक बरणी, निकामी चार्जरची प्लगपिनसह आवश्यकतेनुसार वायर, प्लास्टिक अथवा लोखंडी घमेले, खराब इंजिन ऑईल, किटकनाशक व पाणी लागते.

बरणीच्या झाकणाला आतून होल्डर बसवून मागील बाजूस दोन छिद्रांतून दोन्ही वायर बाहेर काढाव्यात.

चार्जरच्या वायरला त्या जोडून घ्याव्यात.

शेताजवळ टांगलेल्या या बल्बच्या खाली घमेल्यातील पाण्यात इंजिन ऑईल किंवा कीटकनाशके टाकून बॅटरी पंप सुरु करावा.

सायंकाळी बाहेर पडलेले भुंगेरे या प्रकाशाकडे आकर्षित होऊन घमेल्यात पडून मृत होतात आणि हुमणी अळीचा नाश होतो.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# 'कसुरी मेथी' म्हणजे बीपी-डायबिटिस आणि मेनोपॉजसारख्या दुखण्यांसाठीची संजीवनीच




**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक** कसुरी मेथी, जिला अनेक जण कस्तुरी मेथीदेखील म्हणतात. मात्र तिचा योग्य उच्चार कसुरी मेथी असाच आहे. पाकिस्तान येथे कसूर नावाचे एक ठिकाण आहे, तिथे उच्च दर्जाची मेथी बनते, वाळवली जाते आणि मोठ्या प्रमाणात विकली जाते. त्यामुळे तिथल्या नावावरून तिला 'कसुरी मेथी' म्हटले जाते. नावाची गोष्ट जितकी नाविन्यपूर्ण आहे, तेवढीच कसुरी मेथी खाण्याचे फायदे देखील तुमच्यासाठी नवीन असतील. मात्र, ते वाचून तुम्ही कसुरी मेथी वापराचे प्रमाण वाढवाल हे नक्की!




कोणत्याही ग्रेव्ही असलेल्या भाजी मध्ये कसुरी मेथी टाकली की भाजीची लज्जत वाढते. हॉटेलमध्येही जवळपास सगळ्या भाज्यांमध्ये कसुरी मेथीचा वापर केला जातो. अनेक जण घरच्या घरी मेथी वाळवून प्रयोग करतात, पण त्याला कसुरी मेथीची चव येतेच असे नाही. त्यावर प्रक्रिया करून ती पॅकबंद केल्याने तिची चव आणि सुवास टिकून राहतो.

याबरोबरच कसुरी मेथी आरोग्यासाठीही अतिशय लाभदायी आहे हे तुम्हाला माहीत आहे का? विशेषतः महिलांसाठी तर ती संजीवनी आहे असेच म्हटले पाहिजे. कसुरी मेथीमुळे रजोनिवृत्तीच्या लक्षणांपासून अर्थात मेनोपॉजच्या काळात आराम मिळतो. त्यात फायटर इस्ट्रोजेन असते जे मेनोपॉज दरम्यान दरम्यान उद्भवणाऱ्या हार्मोनल असंतुलनाच्या लक्षणांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे अतिस्राव, स्वभावाचे असंतुलन आणि इतर हार्मोनल समस्या कमी होतात.

तसेच कसुरी मेथीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आढळते जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. गॅस , बद्धकोष्ठता आणि पोटासंबंधी विकार कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. यात अँटी-फ्लॅट्युलेंट गुणधर्म आहे, ज्यामुळे पोट स्वच्छ राहण्यास मदत होते.

कसुरी मेथीमध्ये हूवीूळीश्रर्शीलळपश नावाचा घडकी असतो, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते. मधुमेही रुग्णांना याचा फायदा होतो. यामुळे रक्तदाबही नियंत्रणात राहतो, कोलेस्ट्रॉल कमी होते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.

# कौशल्य विकास केंद्राचा महारोजगार मेळाव्याला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३अमरावती,**

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती, आणि सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी डव्हान्समेंट, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आज यशस्वीरित्या पार पडला.

या मेळाव्याला आमदार संजय खोडके, आमदार श्रीमती सुलभा खोडके, श्री गणेशदास राठी छात्रालय समितीचे वसंतकुमारजी मालपाणी तसेच श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भांगडिया आणि प्रा. दिवेश सूर्यवंशी, श्रीमती चांडक यावेळी उपस्थित होत्या.

या मेळाव्याला जिल्ह्यासह परिसरातील विविध तालुक्यांमधून ४०० पेक्षा अधिक उमेदवारांनी उपस्थिती लावली. यामध्ये ३०० हून अधिक रिक्त पदांसाठी विविध नामांकित कंपन्या, ज्यात रेमंड लाइफस्टाइल, कॉटन अमरावती, इंडस्ट्रीज प्रा.लि., गुरुलक्ष्मी कोटेक्स प्रा.लि., टेक्नोक्रॉफ्ट, फ्लिपकार्ट, मुस्ली टोयोटा बजाज ऑटो, कोअर प्रोजेक्ट, आयलर्न फाउंडेशन, जाधव गियर्स लि, स्पंदन मायक्रो फायनान्स प्रा.लि., स्विगी, रेडियंट हॉस्पिटल, जिनस पॉवर लि. यांचा सहभाग होता. उद्योग, उत्पादन, आयटी, विक्री, मार्केटिंग आणि इतर क्षेत्रांतील प्रतिनिधींनी थेट ४७६ मुलाखती घेतल्या. यात २२४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर ४ उमेदवारांची अंतिम निवड जागेवरच करण्यात आली व मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले. इतर उमेदवारांच्या मुलाखती पुढील प्रक्रियेसाठी शॉर्टलिस्ट करण्यात आल्या. या मेळाव्यातील ठळक बाबींमध्ये ७ हजार१०० उमेदवारांची (ऑनलाइन/ऑफलाइन) उपस्थिती, १४ हून अधिक कंपन्यांचा सहभाग, ३०० पेक्षा जास्त रोजगाराच्या संधींची उपलब्धता आणि १०वी पास ते पदवीधरांपर्यंतच्या उमेदवारांचा सहभाग यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संजय खोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. श्री . खोडके यांनी अमरावती व



विदर्भातील उद्योजकतेच्या आणि रोजगाराच्या संधींबाबत माहिती दिली.

आकडेवारी व प्रात्यक्षिक उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी उपस्थित उमेदवारांसमोर स्थानिक उद्योगविश्वाचे स्पष्ट चित्र मांडले. ते म्हणाले की, नोकरीची संधी उपलब्ध झाल्यानंतर जरी त्यामध्ये अडथळे निर्माण झाले, तरी त्या अडथळ्यांना मेहनतीने, जिद्दीने व विकासाने सामोरे जाण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये असले पाहिजे, तरच आपण आपले ध्येय गाठू शकतो. त्यांनी युवकांना उद्योगधंद्यांची नवदिशा दाखवण्याबरोबरच, रोजगारक्षम असणाऱ्या उमेदवारांना नव्या संधी मिळाव्यात यासाठी प्रेरणा दिली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आमदार श्रीमती सुलभा खोडके उपस्थित होत्या. त्यांनी शासन, लोकप्रतिनिधी आणि उद्योजक यांच्या सुसंवादातून स्थानिक युवक-युवतींना रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध करून देता येतील यावर माहिती दिली. युवकांनी कौशल्य वाढवून नवनवीन संधी मिळवाव्यात आणि आपल्या यशाने संपूर्ण जिल्ह्याचे भाग्य समृद्ध करावे, असे मत त्यांनी व्यक्त केले. नोकरी इच्छुक उमेदवारांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

रोजगार मेळाव्यामुळे जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या असून, भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे , असे आयोजक जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीमती प्रांजली बारस्कर यांनी सांगितले.रोजगार मेळाव्याचे सूत्रसंचालन श्रीमती संपदा डावरे यांनी केले.

# तिवसा तालुक्यात प्रारुप प्रभाग रचनेवर आक्षेप

## एक जि.प. गट व पं. स. गणांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३तिवसा**–आगामी होऊ घातलेल्या जिल्हापरिषद व पंचायतसमिती निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक विभागाने १४ जुलै रोजी जिल्हापरिषद व पंचायत त्तमितीमधील गटाची तसेच गणाची प्रारूप व प्रभाग रचना जाहीर करून



त्यावर २१ जुले पर्यंत आक्षेप मागितले होते. यावर तिवसा तालुक्यातून एका जिल्हापरिषदेमधील गट व एक पंचायत समितीमधील गणावर आक्षेप नोंदविण्यात आले आहे.

तिवसा तालुक्यात जिल्हापरिषदेचे तीन गट असून पैकी वन्हा गटात मार्डी गावाचा समावेश असून तो कुद्धा या गटात समावेश करण्यात यावा, याबाबत मार्डी येथील ग्रामपंचायत सरपंच यांनी आक्षेप नोंदविला आहे. तर पंचायत समिती गणामधील वरखेड या गणात असलेली काही गावे तळेगाव ठाकूर या गणात, तरतळेगावठाकूर गणातील काही गावे वरखेड गणात घेण्यात ४ यावी, याबाबतची हरकत आक्षेप तिवसा पंचायतसमितीचे माजी सदस्य रामकृष्णा गावनर यांनी केली आहे.या हरकतीवर आक्षेप यावर आता विभागीय आयुक्तालयात सुनावणी होऊन याबाबत ११ ऑगस्ट रोजी निर्णय होऊन १८ ऑगस्टला अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात येणार आहे

# इयत्तावी व आठवी खुलासा पाचने प्रविष्ट करा

## गाडीच्या नावनोंदणीसाठी सूचना सुरू ठेवा, ३१ जुलै अंतिम मूदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३३अमरावती–** मुक्त विद्यालय मंडळ इकोलय पाच व महाराष्ट्र च्या शुल्कता प्रवेशव्यवस्था प्रवेशाचे ऑनलाइन नोंदणी नोंदणी अर्ज ३१ पर्यंत जुलूम स्वीकारण्याचा पर्याय आहे. संबंधित पालकनी आणि पालकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मुक्त मंडळ पुणेचे प्रमोद गोफणे यांनी केले आहे.

दि. १७ जुलै ते ३१ जुलै २०२५ या निवडणूक परीक्षानी वैधानिक अर्ज भरणे आवश्यक आहे. चौकीनी पासवर्ड अर्ज, वि शुल्क व कागदपत्रपत्रे अर्जावर लिहिलेल्या संपर्क केंद्रात दि. ४ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत जमा करावे. २३ ऑगस्ट २०२५ पर्यंत संपर्क केंद्र शाळा परीक्षा अर्ज विल्हेवाट शुल्क, पासवर्डपत्रे व परीक्षा यादी विभागीय बोर्ड बोर्ड जमा करा.

इ पाचवी व आठवता प्रविष्ट प्रविष्टी प्रविष्टी http://msbo.mh-ssc.ac.in या स्थळाचा वापर करून अर्ज भरते सुरू संकेतस्थळांचे पालन करावे, तसेच मंडळाचे प्र. सचिव श्री. गोफणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

बुधवार दि. २३ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# पुरवठा विभागाने दिली डेडलाईन
## बंद मशीनमुळे धान्य मिळेना

### सर्व्हरने घातला ई-केवायसीत खोडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धा.रेल्वे-** पुरवठा विभागाने ई-केवायसी करण्यासाठी डेडलाईन ठरवून दिली खरी पण, रेशन दुकानदारांकडे असलेले ई-पॉस मशीन सात दिवसांपासून सर्व्हर डाऊन असल्याने बंद आहेत. ना, ई-केवायसीचे काम होते, नाधान्य वाटप, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली असून नागरिकांच्या रोषाला रेशन दुकानदारांना सामोरे जावे लागत आहे.



राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतून ५९ हजार रूपये उत्पन्न असलेल्या नागरिकांना दर महिन्याला मोफत. धान्याचा लाभ दिला जातो. हाताच्या अंगठ्याचा ठसा घेतल्यानंतर लाभार्थ्याला धान्य वितरीत केले जाते. दुसरीकडे ई-केवायसी नसेल तर सप्टेंबरपासून धान्याचा लाभमिळणार नाही, असा फतवाच पुरवठा विभागाने काढला आहे. अजूनही सहा लाखांवर नागरिकांची ई केवायसी झालेली नाही. हे काम करून घेण्यासाठी संबंधितांना ३१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही सूचित करून देण्यात आले आहे.मशीन बंद असल्याने दोन्हीही कामे खोळंबली आहेत, नागरिक संताप व्यक्त करीत असल्याने बऱ्याच दुकानदारांनी दुकानाला टाळे ठोकून घरी बसणे पंसत केले आहे. दुसरीकडे ३१ जुलैपर्यंत ई-केवायसी न झाल्यास धान्याचा लाभ मिळणार नसल्याने नागरिक या कामासाठी जीवाचा आटापिटा करीत आहेत. मात्र सर्व्हर डाऊन ही समस्या सरकारची असल्याने त्याचा फटका नागरिकांना बसणार आहे. या समस्येअभावी ई-केवायसी न झाल्यास आणि धान्याच्या लाभापासून लाभार्थी वंचितराहिल्यास त्याची जबाबदारी पुरवठा विभाग घेणार का, हा खरा प्रश्न आहे.

लाभार्थींचा दुकानदारांशी वाद डेड लाईन ठरवून दिली खरी पण, ज्याठिकाणी ई-केवायसी करायची आहे, ते रेशन दुकानदारांकडील ई-पॉस मशीन जवळपास सात दिवसांपासून बंद आहे. सर्व्हर डाऊन असल्याचे कारण पुढे करण्यात आले आहे. एनआयसी मार्फत ही समस्या दूर करण्याचे काम सुरू असून त्यात संबंधितांना अद्यापही यश आले नाही. कामधंदे बाजूला ठेऊन नागरिक ई-केवायसी करून घेण्या साठी रेशनदुकानात पोहचत असले तरी त्यांना मात्र आल्या पावली माघारी परतावे लागत आहे. धान्य घेण्यासाठी जाणाऱ्या लाभार्थ्यांनाही हाच अनुभव येत आहे. मशीनच बंद असल्याने धान्य मिळत तर नाहीच नाही, शिवाय ई-केवायसीदेखील होत नाही. त्यामुळे संतापलेल्या नागरिकांकडून दुकानदारांनाच धारेवर धरले जात आहे. रेशन दुकानादारांनाही मुकाट्याने सहन करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

#### ॲपवर केलेली ई-केवायसी दिसेना

भ्रमणध्वनीत संबंधित ॲप डाऊनलोड करून घरच्या घरीच ई-केवायसी करता येते. मात्र अशा पध्दतीने अनेक जणांनी ई-केवायसी केली असली तरी पुरवठा विभागाच्या लेखी ते ई-केवायसी विनाच असल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित नागरिकांना रेशन दुकानात बोलावून ई-केवायसी करून घेण्याची जबाबदारी दुकानदारांवर सोपविण्यात आली. पण,सर्व्हरच डाऊन असल्याने दुकानदारही हतबल झाले आहे.

# नव्याने बांधलेली सुरक्षा भिंत कोसळली
## निकृष्ट दर्जाचे काम उघडकीस, कंत्राकदार विरोधात संतापाची लाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धारणी-** येथील जिल्हा परिषद हायस्कूल या प्रतिष्ठित शाळेच्या अलीकडेच बांधलेल्या सुरक्षा भिंतीचा एक भाग कोसळल्याने खळबळ उडाली आहे. ही भिंत वर्ष २०२४ मध्ये शाळेच्या सुरक्षेसाठी नव्याने बांधण्यात आली होती. भिंत कोसळल्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. भिंत कोसळल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण भिंत कोसळलेली घटना शाळा सुरू असताना घडली नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. व याच भिंतीलगत विद्यार्थी रोज ये-जा करतात हे लक्षात घेता ही घटना किती गंभीर आहे, याचा सहज अंदाज येतो.धारणी येथील ही जिल्हा परिषद शाळा सुमारे पन्नास वर्षांहून अधिक जुनी असून परिसरातील एक प्रतिष्ठित शिक्षण संस्था आहे. या शाळेत गरीब, मध्यमवर्गीय, तसेच उच्चभ्रू घरातील विद्यार्थी शिक्षण घेतात. याशाळेतूनशिक्षणघेऊन अनेक विद्यार्थी आज राज्य व केंद्र सरकारच्या उच्च पदांवर कार्यरत आहेत. अशा शाळेच्या



भिंतीचे असे कोसळणे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे प्रतीक मानले जात आहे. कोसळलेलीभिंत काही महिन्यांपूर्वीचबांधण्यात - आली होती. तथापि, अल्पावधीतच ती कोसळल्याने बांधकामाच्या दजार्बाबत गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी कंत्राटदाराने वापरलेल्या न साहित्याची व कामाच्याप्रक्रियेचीकसून चौकशी त करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे शासकीय निधीच्या वापराबाबत व पारदर्शकतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. बिल मंजुरी, कामाचे परीक्षण व देखरेख यामध्येही त्रुटी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. स्थानिक नागरिक, पालक आणि माजी विद्यार्थी संघटनांकडून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सुदैवाने या घटनेत क ो ण त ा ह ी जीवितहानीकिंवाविद्यार्थ्यांना इजा झालेली नाही. मात्र, ही घटना शाळेतील सुरक्षाव्यवस्थेचा आणि प्रशासकीय जबाबदारीचा गजर करणारा गंभीर इशारा मानली जात आहे. या घटनेने केवळ धारणी नव्हे तर संपूर्ण मेलघाट परिसरातील शासकीय शाळांच्या बांधकाम गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. लोकप्रतिनिधींनी आणि प्रशासनाने तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आता नागरिकांकडून दिला जात आहे.

# श्रावणाच्या प्रारंभीच फळांना आला भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** मराठी श्रावण महिन्याला २५ जुलैपासून सुरुवात होत आहे, तर हिंदी बांधवांच्या श्रावण महिन्याला प्रारंभ झाला आहे. या काळात फळांना वाढती मागणी असते. श्रावणातील वाढत्या मागणीमुळे आता भाज्यांपाठोपाठ फळे देखील १० टक्क्यांनी महागली आहेत.



श्रावण महिन्यात उपवासामुळे अनेकजण भाज्या आणि फळांवर अवलंबून असतात. त्यामुळे भाज्यांसह फळांनाही अधिक मागणी असते. यंदा सुरुवातीला महाराष्ट्रातील काही भागात झालेल्या जोरदार पावसामुळे भाज्यांची बाजारपेठेतील आवक घटून तसेच भाजीपाला खराब जाळ्याने भाज्या ह्या १५ ते २० टक्क्यांनी महागल्या आहेत. त्यापाठोपाठच आता वाहतूक खर्च तसेच वाढती मागणी यामुळे श्रावणात फळे देखिल १० ते १५ टक्क्यांनी महागली असल्याचे शहरातील फळ विक्रेत्यांनी सांगितले. जिल्ह्यातील बाजारपेठेत जळगाव, भुसावळ तसेच गुजरात येथून केळ्याची आवक होत असते. काश्मीरच्या सफरचंदाची मुंबईद्वारे आयात होत असते. मात्र सध्या ती काहीशी आंबट असल्याने त्याची खरेदी मोठ्याप्रमाणात होत नाही. श्रावणातील वाढत्या मागणीमुळे आता भाज्यां पाठो पाठ फळे देखील १० टक्क्यांनी महागली आहेत. तसेच भाजीपाला खराब जाळ्याने भाज्या ह्या १५ ते २० टक्क्यांनी महागल्या आहेत याशिवाय पेरू, मोसंबी, हिरवी द्राक्षे, संत्री, चिकू, या फळांचा सध्या सीझन नसल्यामुळे त्याची आवक राज्यातून होत नाही. पेरूचा सीजन नसल्याने ते परराज्यातून येत आहेत. श्रावणात वृतवैकल्यांमुळे फळ खरेदीकडे सर्व ग्राहकांचा ओढा असतो.

#### पुन्हा वाढणार किमती

हिंदी श्रावण महिना सुरू असल्याने फळांच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यामुळे फळांच्या किमती सध्या १० टक्क्यांपर्यंत महागल्या आहेत. पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे.- धीरज गुप्ता, फळविक्रेता,

#### असे आहेत दर

केळी ६० (डझन ) इलायची केळी ८० (डझन) डाळींब १५०-२०० (किलो) सफरचंद २०० (किलो) पपई ८० (किलो) पेरू १६० (किलो) द्राक्ष २०० (किलो) चिकू १८० (किलो)

# कृउबास सचिव पदावरून विजयकरांना हटवले
## सहकार विभागाच्या उपनिबंधक स्वाती गुडधे यांच्याकडे सोपवली सूत्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-**
अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर यांचा पदभार काढून घेण्यात आला. या पदाची सूत्रे सहकार विभागाच्या उपनिबंधक स्वाती गुडधे यांच्याकडे सोपवली आहेत. आ. संजय खोडके यांनी लक्षवेधीद्वारे बाजार समितीच्या कामकाजातील घोटाळा विधिमंडळात गाजवला होता. त्यामुळे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सचिवांना तत्काळ त्या पदावरून हटवून त्यांना अकार्यकारी पदावर ठेवण्याचे आदेश दिले. त्यानुसार विजयकर यांना सचिव पदावरून हटवून त्यांचे कामकाज उपनिबंधक गुडधे यांच्याकडे सोपवण्यात आले. पणन महासंचालनालयाच्या पत्रानुसार जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी ही कारवाई केली. जिल्हा उपनिबंधकांच्या प्रशासकीय मान्यतेनुसार सन २०१४ पूर्वी कृउबासला ४४ लाख रुपयांची बांधकामे व विद्युत विभागाशी संबंधित आणखी ३ कामे करण्याची परवानगी दिली होती. परंतु त्या कामात गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आल्याने सर्व कामांची चौकशी करण्यात आली.




चौकशीअंती गैरव्यवहार सिद्ध झाल्याने सचिवांना मूळ पदावरून हटवून त्यांच्याकडे अकार्यकारी कामे सोपवा, असे आदेश डीडीआरने दिले होते. मात्र ही संपूर्ण कार्यवाही चुकीच्या दस्तावेजावर आधारित असल्याचे सांगून तत्कालीन संचालक मंडळाने तसे केले नाही. दरम्यानच्या काळात सचिवांनीही संबंधितांच्या आदेशाला आव्हान देत आपले पद शाबूत ठेवले होते. आता पुन्हा तोच मुद्दा विधिमंडळातील लक्षवेधीद्वारे चर्चेत आल्याने पणन मंत्र्यांनी सचिव दीपक विजयकर यांचा पदभार काढून घेत संचालक मंडळाच्या बरखास्तीबाबत उच्च न्यायालय जो निर्णय देईल, त्यानुसार पुढे जाण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसारच विजयकर यांच्यावर कारवाई करण्यात आली असून, संचालक मंडळाच्या बरखास्तीबाबत न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा केली जात आहे.

# अपघातातील पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू
## तीन जखमी पोलीस अंमलदारावर उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मोर्शी चांदूररेल्वे** - अमरावती मार्गावर बासलापूर ते चिरोडीदरम्यान पोलिसांच्या सायबर सेल, अमरावती ग्रामिणच्या चारचाकी वाहनाच्या अपघाताची घटना रविवारी (ता. २०) रात्री ११ वाजताच्या दरम्यान घडली होती. या अपघातातील जखमी मोहन अंबादास सयाम (वय ४२, रा. अमरावती) यांचा उपचारादरम्यान सोमवारी रात्री ८ वाजताच्या दरम्यान अमरावती येथील खाजगी रूग्णालयात मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तर उर्वरित तीन जखमी पोलीस कर्मचाऱ्यांवर उपचार सुरू आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, सायबर सेलची टीम ही चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील चोरी संदर्भातील गुन्ह्याचा मोबाईल डाटा मिळविण्याकरीता सरकारी वाहनाने (एमएच २७ एए ०६३८) आले होते व परत अमरावतीकडे जात असतांना बासलापूर ते चिरोडीदरम्यान रस्त्यावर अपघात झाला. वाहनामधील पोलीस अंमलदार मोहन अंबादास सयाम, पंकज गोलाईतकर, रितेश गोस्वामी व



गुणवंत सिरसाट हे चौघे जखमी झाले होते. सर्व जखमींना अमरावती येथील एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. यात उपचारादरम्यान मोहन अंबादास सयाम यांचा सोमवारी मृत्यु झाला. तर इतर जखमींवर उपचार सुरू आहे. वळणावर प्राणी आडवा आल्याने अपघात घडल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

# मनपा कर वसुली वाढीसाठी थकबाकीदारांना नोटीस द्या
## आयुक्तांचे बैठकीत मालमत्ता कर अधिकाऱ्यांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
वसुलीच्या कामात कुठलीही कुचराई खपवून घेतली जाणार नाही. सहाय्यक संचालक नगर रचना विभागाने जास्तीत जास्त मालमत्ता रेग्युलराइज करण्यासाठी तातडीने कारवाई करावी, मोठ्या थकबाकीदारांची तपासणी करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी करवसुली विभागाला दिले.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका कॉन्फरन्स हॉलमध्ये करवसुली विभागाच्या अधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये मालमत्ता कर वसुली अधिक प्रभावी व गतिमान करण्याबाबतसविस्तर चर्चा होऊन ठोस निर्णय घेण्यात आले.

त्यावेळी त्यांनी उपरोक्त निर्देश दिलेत. कर भरण्याचे प्रमाण वाढवण्यासाठी तातडीने विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात तसेच, प्रलंबित थकबाकीदारांकडून कर वसूल करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचा निर्णय महापालिका आयुक्तांनी घेतला.

महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी करवसुली हा मुख्य आधार आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी जबाबदारीने व काटेकोरपणे काम करावे. नागरिकांमध्ये करप्रणालीबाबत जनजागृती वाढवावी आणि सुलभ सेवा द्यावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी दिले. या



बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना घनश्याम वाघाडे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे यांच्यासह सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानगरपालिकेच्या सेवा सुरळीत चालवण्यासाठी वेळेवर कर भरणे गरजेचे आहे. आपला थोडासा सहभाग आपल्या शहरात मोठा बदल घडवू शकतो, असे आवाहन सौम्या शर्मा यांनी बैठकीतून नागरिकांना केले.

#### बैठकीत घेण्यात आलेले महत्वपूर्ण निर्णय

ई-पेमेंट सुविधेचा प्रचार करणे व प्रोत्साहन देणे
थकीत करदात्यांना नोटिस पाठवण्याची प्रक्रिया गतीमान करणे
मोठ्या थकबाकीदारांवर कायदेशीर कारवाई सुरू करणे
शहरभर जनजागृती मोहीम राबवणे
समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करणे
कर वसुली प्रक्रियेत तांत्रिक पारदर्शकता व सुलभता वाढवणे
२ व ३ ऑगस्ट रोजी मालमत्ता कर शिबिरांचे आयोजन करणे.

# शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचा मुहूर्त ठरला

## मोर्शीत ३ ऑगस्टला भूमिपूजन सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मोर्शी** तालुक्यात शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालय निर्माण करण्याचे खा. अनिल बोंडे यांच्या सातत्याच्या प्रयत्नाला अखेरीस यश मिळाले. ३ ऑगस्ट रोजी या महाविद्यालयाची मुहूर्तमेढ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'घांच्या हस्ते होणार आहे. सदर महाविद्यालय हे राष्ट्रीय नकाशावर येणार आहे. या महाविद्यालयामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नीलक्रांतीला हातभार लागणार असून मासे उत्पादनामध्ये पश्चिम विदर्भाची नोंद होणार आहे.

महाविद्यालय भूमिपूजन उपमुख्यमंत्रीद्वय अजित पवार, एकनाथ शिंदे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे, दुग्धविकास मंत्री अतुल सावे, प्रधान सचिव मत्स्य व्यवसाय डॉ. रामास्वामी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीनपाटील, आयुक्त मत्स्य व्यवसाय, जिल्ह्यातील खासदार व आमदार, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तसेच संपूर्ण विद्यापीठाचे कार्यकारी परीषद सदस्य व विद्यापीठाचे संचालक, अधिष्ठाता उपस्थिती राहणार आहे. या महाविद्यालयाच्या स्थापनेकरिता उपसचिव सिद्धेश्वर मोकाशी, आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्यसुनील सोमवंशी यांनी सहकार्य केले. पश्चिम विदर्भामध्ये असणारी धरणे, तलाव, शेततळे यामध्ये मत्स्य उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. भोई समाजासह मासेमारी करणाऱ्यांच्या रोजगारामध्ये वाढ होणार आहे. अन्नसुरक्षा साखळी मजबूत करण्याकरिता व खाद्य कौशल्य विकासा कारिता हे महाविद्यालय उपयुक्त ठरणार आहे. विदर्भातील अमरावती विभागामध्येमुबलक उपलब्ध जलसंपत्ती विचारात घेऊन मोर्शी तालुक्यातील नलदमयंती सागर (अप्पर वर्धा प्रकल्प) परिसरामध्ये मत्स्य विज्ञान महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी तत्कालीन आमदार डॉ. अनिल बोंडे यांनी २०१७ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली होती. त्या अनुषंगाने ८ मार्च २०१९ रोजी मंत्रीमंडळ बैठक घेऊन शासन निर्णय काढण्यात आला होता. त्यानुसार मत्स्य विज्ञान महाविद्यालय मंजूर झाले. परंतु, सन २०१९ ला विधानसभा निवडणूक कार्यक्रम व त्यानंतर कोविड-१९ या महामारीने महाविद्यालय सुरू झाले नाही. सन २०२२ मध्ये डॉ. अनिल बोंडे यांनी खासदार या नात्याने पुन्हा पत्राद्वारे शासनास विनंती करून पाठपुरावा केल्याने पुन्हा मंत्रिमंडळ बैठकीत सदर विषय आला. २१ मार्च २०२५ रोजी सुधारित २०२ कोटी रुपयाचाशासन निर्णय झाला. मोर्शी येथीलमत्स्य व्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ३३ हेक्टर जागेवर प्रक्षेत्र उभारणी होणार आहे.हे प्रक्षेत्र विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक व संशोधन करिता राहणार आहे. सदर जागा मत्स्य विद्यापीठास हस्तांतरित झाली आहे. मोर्शीच्या अप्पर वर्धा वसाहतीत असणारी ४.०८ हेक्टर जागा विद्यापिठाच्या इमारत बांधकामास आवश्यक असल्याने ती जागा जलसंपदा विभागाने विद्यापीठास हस्तांतरित केली आहे.


### राज्यातले चवथे महाविद्यालय

राज्यामध्ये आतापर्यंत एकूण ३ महाविद्यालय होती. त्यापैकी एक हे कोकण विद्यापीठ अंतर्गत रत्नागिरी येथे आहेत व दुसरे महाराष्ट्र पशु व. मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि तिसरे याच विद्यापीठांतर्गत उदगीर येथे आहे. पश्चिम विदर्भातील मोर्शी येथे नव्याने मंजूर मत्स्य विज्ञान महाविद्यालय हे राज्यातील चौथे महाविद्याल राहणार आहे.

### प्रवेश प्रक्रियेला झाली सुरुवात

या महाविद्यालयाच्या माध्यमातून शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाचे ५०० लक्ष मत्स्य बीज निर्मितीचे उद्दीष्ट पूर्ण होणार आहे. मत्स्य शेती व मत्स्य सहकारी संस्थेच्या विकासाला हातभार लागेल. मत्स्य महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यापीठाच्या वेबसाईटवर जाऊन अर्ज करण्याची अंतिम तारीख १९ ऑगस्ट असून प्रथम वर्षाला एकूण विद्यार्थी संख्या ४० राहील. महाविद्यालयास लागणाऱ्या पदांना शासनाने १७ जुलैला मान्यता दिली आहे. प्रथम वर्ष म्हणजेच सन २०२५-२६ काळात हे महाविद्यालय सिंभोरा जवळील मत्स्य व्यवसाय विभागाने हस्तांतरित केलेल्या इमारतीमध्ये सुरु करण्यात येणार आहे.

# अमरावती जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा २७ जुलैला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती** महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशनशी संला असलेल्या जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, द्वारा संचालित डिग्री कॉलेज अऑफ फिजिकल एजुकेशन व बृहन महाराष्ट्र योग परिषदद्वारा सहाव्या जिल्हास्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेचे व राज्यस्तरीय योगासन स्पर्धे करीता निवड चाचणीचे आयोजन २७ जुलै २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालय येथे होणार आहे.या वर्षीच्या स्पर्धेचा अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात आला असून विविध प्रकारांमध्ये एकूण दहा प्रकारामध्ये योगासन स्पर्धा घेतली जाणार आहेत. यामध्ये ट्रेडिशनल योगासन, आर्टिस्टिक योगासन सिंगल, आर्टिस्टिक योगासन पेअर, रिदमिक योगासन पेअर, फॉरवर्ड बेड इंडिविज्युअल इव्हेंट, बैंक बेड इंडिविज्युअल इव्हेंट, हॅन्ड बॅलेन्स इंडिविज्युअल इव्हेंट, लेग बॅलेन्स इंडिविज्युअल इव्हेंट, ट्रिस्टिंग बॉडी इंडिविज्युअल इव्हेंट, सुपाईन इंडिविज्युअल इव्हेंट हे प्रकार सामावले आहेत. यासर्व प्रकारांमध्ये कोड ऑफ पॉइंट्सनुसार गुणांकन केले जाणार आहे. या नियमावलीनुसार स्पर्धकांचे आसनांचे अचूकपणा, शारीरिक समतोल, सुसूत्रता आणि सांघिक सादरीकरण यांचे परीक्षण होणार आहे.

स्पर्धेच्या आयोजनामध्ये विविध वयोगटानुसार महिला व पुरुष स्वतंत्र विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये १० ते १४ वर्षे वयोगटासाठी सब ज्युनिअर, १४ ते १८ वर्षे वयोगटासाठी ज्युनिअर, १८ ते २८ वर्षांपर्यंत सिनीअर गट, तसेच २८वर्षांवरील वयोगटासाठी सिनीअर ए, बी आणि मी असे तीन स्वतंत्र गट तयार करण्यात आले आहेत. वयोगट निक्षित करताना १ जानेवारी २०२५ ही कट-ऑफ तारीख मान्य करण्यात आली आहे.प्रत्येक खेळाडूसाठी अधिकतम चार स्पर्धामध्ये सहभाग घेण्याची परवानगी असेल. स्पर्धे साठी इच्छुक खेळाडुनी २३ जुलै २०२५ पर्यंत ऑनलाइन फॉर्मद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. फॉर्म नेसत्रश मी वर उपलब्ध असून नोंदणी जुल्क शंभर रुपये इतके आहे. नोंदणीसाठी आधार कार्ड झेरॉक्स, जन्मतारखेचा पुरावा, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, आयडी कार्ड आणि दोन पासपोर्ट साईज फोटो आवश्यक आहेत.संपूर्ण स्पर्धेच्या आयोजनासाठी डॉ. बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पावास यांच्या मार्गदर्शन डॉ. सुनील कुमार यांच्या नेतृत्वात आयोजनाही तयारी करण्यात येत आहे. स्पर्धेच्या दिवशी सकाळी ९ वाजता सर्व नोंदणी केलेल्या स्पर्धकांनी हजर राहायचे आहेअधिक माहिती करिता ८२७५७५३६४८ किंवा ७०२१७७६६४० या नंबर वर व्हाट्सअप मॅसेज करावा.

# वनविभागाच्या बदलीतील अनियमिततेला लागणार चाप

## सहा महिन्यात समिती गठित करा, हायकोर्टाचे सरकारला आदेश

### बहुजनाय वनविभाग अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या याचिकेवर निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
ऑनलाईन बदलीच्या न्यायासाठी न्यायालयात दाखल केलेल्या प्रार्थना याचिकेवर उच्च न्यायालयाने राज्य शासनाला आदेश निर्गमित करुन न्याय मिळवून दिला आहे.लोकशाही शासन प्रणालीतील हा न्यायाचाच विजय आहे. शासनाच्या शिक्षक व इतर विभागात ऑनलाईन पद्धतीने बदलीचे धोरण अवलंबिले जात होते. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या वन विभागात सुध्दा गैरप्रकार टाळून बदलीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी वनविभागातही सन २०२५ पासून ऑनलाईन बदली धोरण ठरवण्यासाठी संघटनेच्या वतीने प्रधान मुख्य वनसंरक्षक वनबल प्रमुख नागपूर तसेच मुख्य सचिव, वनमंत्री, मुख्यमंत्री यांनी राज्यपाल स्तरावर तब्बल एक वर्ष पाठपुरावा केला परंतू शासनानेकोणतीही दखल घेतली नाही.ऑनलाईन बदली धोरण हे पारदर्शक बदली धोरण आहे. शासनाच्या बहुतांशी विभागात अशाच पध्दतीने कर्मचा-यांच्या बदल्या होतात. ज्यामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळत नाही. म्हणूनच राज्य शासनाच्या वन विभागातही अशीच प्रणाली कार्यरत व्हावी, यासाठी बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटनेचा लढा होता. शासन स्तरावर या मागणीला न्याय न मिळाल्यामुळे संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र विष्णूपंत गांजरे यांनी उच्च न्यायालय नागपूर येथे रिट याचिका (३५५१/२०२५) दाखल केली.यापूर्वी कर्मचाऱ्यांना वनविभागातील बदलीसाठी मोठी कसरत करावी लागत होती. वन विभागातील कर्मचाऱ्यांना बदलीसंदर्भात मानसिक आर्थिक, शारिरीक व दृष्ट्या त्रास होत असल्याची ओरड होती. आपल्या बदलीसंबंधी अन्याय झाल्यास न्यायालयात दाद मागण्याची वेळ त्यांचेवर येत होती. कधी कधी अन्यायकारक बदली होणे, कधी कधी दोन-तीन महिन्यातच बदली होणे, काहींची पाच वर्षे कालावधी पूर्ण होऊनही बदली न होणे, पसंतीक्रमानुसार समुपदेशन न होणे, बदली झाल्यानंतरही कार्यमुक्त न करणे असे प्रकार घडत होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भ्रष्टाचार मुक्त बदली धोरण अस्तित्वात येण्यासाठी बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना प्रदेशाध्यक्ष राजेंद्र गांजरे यांनी प्रयत्न सुरू केले. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ऑनलाईन बदली धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर यांच्या खंडपिठासमोर सुनावणी झाली

# सख्या अल्पवयीन मुलीवर लैंगिंग अत्याचार

## नराधम पित्याला तात्काळ अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अचलपुर,** एका ४० वर्षीय नराधम पित्याने त्याच्या सख्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैगींग अत्याचार केल्याची धक्कादायक घटना परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. याबाबत तक्रार येताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी पित्याला अटक केली.

नरेंद्रसिंह निकुम असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, आरोपी नरेंद्रसिंह हा मुळचा मध्यप्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील सुरगाव बंजारी गावातील रहिवासी आहे. तो पत्नी व १४ वर्षाच्या मुलीसह काही महिन्यापासून परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कांडली येथील भाड्याच्या घरात राहत होता आणि एका दुकानात काम करित होता. नरेंद्रसींहची पत्नी सुध्दा कामाला जात असल्याने पिडीत मुलगी ही दुपारच्या सुमारास घरी एकटी राहत होती. अशातच नरेंद्रसींह हा २१ जुलै रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास

जेवणासाठी घरी आला. मुलीने त्याला जेवायला वाढले आणि ती स्वयंपाक खोलीत बसून अभ्यास करित होती. अशातच जेवण झाल्यानंतर नरेंद्रसींहने

### परतवाडा पो.स्टे. हद्दीतील धक्कादायक घटना

अचानक स्वयंपाक घरात येऊन मुलीला निर्वस्त्र केले आणि स्वतःही निर्वस्त्र होऊन तिच्यावर लैगींग अत्याचार केला. तसेच याबाबत आईला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. तरी देखील मुलीने आई घरी आल्यानंतर घडलेला घृणास्पद प्रकार तिला सांगितले. मुलीची आपबिती ऐकताच आईने मुलीसह थेट परतवाडा पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता परतवाडा पोलिसांनी तात्काळ आरोपी नरेंद्रसींहला अटक करून त्याच्यावर पोस्को ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर कामांची आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्याद्वारे पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती** अमरावती महानगरपालिकेअंतर्गत शेगाव प्रभाग क्र. १ येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २०२३-२०२४ मध्ये झोन क्र. १ मध्ये मंजूर झालेल्या विविध विकास कामांची आज दिनांक २२/०७/२०२५ रोजी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या योजनेअंतर्गत संबंधित भागात रस्ते मजबुतीकरण, नाली बांधकाम, पाणीपुरवठा व अन्य नागरी सुविधा सुधारण्यासाठी विविध कामे मंजूर करण्यात आली आहेत. या कामांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन आयुक्तांनी दर्जा, गती व कामाच्या प्रगतीबाबत माहिती घेतली. संबंधित अभियंत्यांना गुणवत्तापूर्ण काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश दिले की, कामाचा दर्जा अबाधित ठेवावा. सर्व मंजूर विकासकामे उच्च दर्जाची असावीत. गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये. निर्धारित वेळेत काम पूर्ण करा. कामे निश्चित वेळापत्रकानुसार पूर्ण होणे आवश्यक आहे. कोणतीही अनावश्यक विलंब सहन केला जाणार नाही. स्थळावर नियमित देखरेख ठेवावी. संबंधित अभियंत्यांनी कामाची नियमित पाहणी करून अडचणी तातडीने सोडवाव्यात. नागरिकांच्या तक्रारींवर तत्पर प्रतिसाद द्यावा. नागरिकांनी मांडलेल्या समस्यांवर त्वरीत कारवाई करावी व त्यांना समाधानकारक सेवा मिळावी. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवावी. सर्व विकासकामे पारदर्शक व जबाबदारीने पार पाडावी, याची दक्षता घ्यावी. कंत्राटदारांवर जबाबदारी निश्चित करावी. कामाच्या गुणवत्तेसाठी संबंधित कंत्राटदार जबाबदार राहतील. निकृष्ट काम केल्यास कठोर कारवाई केली जाईल. नागरी वस्त्यांमध्ये स्वच्छता आणि आरोग्यदायी वातावरण राखण्यासाठी विशेष लक्ष देण्यात यावे. नागरिकांच्या सहभागातूनच शाश्वत विकास शक्य आहे, असे आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले.

नागरिकांनी आयुक्तांसमोर त्यांच्या काही अडचणी मांडल्या असता, त्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे योजनेमधून नागरी वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरविणे हा उद्देश असून, महानगरपालिका नागरिकांच्या सहकार्याने ही उद्दिष्टे प्रभावीपणे पूर्ण करीत आहे.

पाहणी दरम्यान शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, उपअभियंता आशिष अवसरे, जयंत काळमेघ, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, महानगरपालिकेचे अभियंते व संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

# अशासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे २५ व २६ ला राज्यस्तरीय अधिवेशन अमरावतीत

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा पुढाकार४०० प्राचार्य सहभागी होणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोशिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेसचे ४० वे वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशन दि. २५ व २६ जुलै २०२५ ला अमरावती येथे होत आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेने पहिल्यांदाच हे अधिवेशन आयोजित केले असून महाराष्ट्रातील ४०० प्राचार्य अधिवेशनासाठी अमरावतीला येत आहेत, अशी माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन ऊपाख्य भय्यासाहेब देशमुख यांनी संस्थेच्या सभागृहात मंगळवारी (ता. २२) बोलाविलेल्या पत्रपरिषदेत दिली.अधिवेशनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील सर्व प्राचार्यांना श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या कार्याचा परिचय व्हावा तसेच 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' वर विचारमंथन व चर्चा व्हावी, हा या अधिवेशनाचा उद्देश असल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात २५ जुलैला सकाळी साडेदहा वाजता महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उदघाटन होणार आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेत उदघाटन कार्यक्रमाला राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषद तसेच राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंचचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, लक्ष्मी नारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजी विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू अतुल वैद्य, महाराष्ट्राचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, रयत शिक्षण संस्था, साताराचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत दळवी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.अमरावती विभागाचे उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, सुकाणू समितीचे सदस्य सी.ए.अनिल राव, अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, उपाध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम आणि सचिव डॉ. सुधाकर जाधवर यांची उदघाटन सोहळयाला विशेष उपस्थिती राहणार आहे.श्री शिवाजी शिक्षण संस्थेने या अधिवेशनाची जबाबदारी स्वीकारली असून संस्थेचे स्वीकृत सदस्य व श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती चे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट हे निमंत्रक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत तर आयोजन समितीचे सचिव म्हणून श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे काम पाहत आहेत. संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.वि. गो.ठाकरे यांच्या मार्गदर्शनात अधिवेशनाची संपूर्ण तयारी झाली असून अधिवेशना च्या निमित्ताने एक स्मरणिका देखील प्रकाशित करण्यात येणार आहे.'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' हे शिक्षणक्षेत्रासाठी एक आव्हान असून या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सखोल विचारमंथन घडून यावे, हा या अधिवेशनाचा उद्देश असून तो निश्चित सफल होईल, असा विश्वास देखील हर्षवर्धन देशमुख यांनी व्यक्त केला. पत्रकार परिषदेला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड.जे. व्ही. पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा. सुभाष बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो. ठाकरे, स्वीकृत सदस्य व आयोजन समितीचे सचिव डॉ. अंबादास कुलट, स्वीकृत सदस्य नरेशचंद्र पाटील, डॉ. पुरुषोत्तम वायाळ, प्राचार्य अमोल महल्ले, आयोजन समितीचे सचिव प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, प्राचार्य फोरमचे सदस्य प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, प्राचार्य डॉ. दिलीप हांडे, प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, प्राचार्य जी.एन. चौधरी, प्राचार्य डॉ. विनय राऊत उपस्थित होते.

# सरन्याधीश न्यायमूर्ती भूषण गवई तीन दिवसांच्या अमरावती दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई हे गुरूवार, दि. २४ जुलैपासून तीन दिवस अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात दारापूर, दर्यापूर आणि अमरावती येथील विविध कार्यक्रमांना न्या. गवई उपस्थित राहतील. रविवार गुरुवार, दि. २४ जुलै मेट्रो ३. ४५ अमरावती विमानतळ येथे आगमन होईल.

शुक्रवार, दि. २५ जुलै रोजी १०.४५ स्वत: दारापूर येथील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहतील. वर ३ वाजल्यापासून दर्यापूर येथील विविध कार्यक्रम उपस्थित राहतील. त्यानंतर ५.३० नियमित दारापूर येथील नवीन लोकशाहीच्या उद्घाटन सोहळा उपस्थित राहतील.

शनिवार, दि. २६ जुलै रोजी स्वत: १०. ३५ जुलै सिपना कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग येथे जिल्हा व सत्र न्यायालय येथे ई-लायब्ररीचे उद्घाटन कार्यक्रम उपस्थित राहून सोयीनुसार बेलोरा विमानतळ कडे रवाना.

# उच्च तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली वचे पालक मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांचा अमरावती दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रद्योग, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली पालकाचे पालक मंत्री चंद्रकांत (चंद्रकांत) पाटील जुलै, दि. २५ जुलै रोजी अमरावती दौरा पुढीलप्रमाणे:

शुक्रवार, दि. २५ जुलै रोजी सकाळी १० राज्य राज्य विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील परीक्षा भवन व प्रशासकीय इमारत, उपहारगृह, प्रवेशाचे सामान्य उद्घाटन कार्यक्रम तंदुरुस्त. आपले ११ लोकशाही असोसिएशन महाराज महाराज, पीडीएससी कॅम्पस, मोर्शी, येथे श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती आयोजित अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स ऑफ़ प्रिन्सिपल्स ऑफ़ नॉनर्नर्न कॉलेजमेंटेसच्या ४० व्या वार्षिक राज्य लिमास रोड. स्थान २ आप्पाजी महाराज वारकरी पीठ, बहिरम कुऱ्हा, चांदूरबाजार येथे आगमन व राखीव. ४ नंतर नागपूरकडे प्रयाण.

# गटविकास अधिकाऱ्याची कर्मचाऱ्यांना तंबीकामात हयगय खपवून घेतली जाणार नाही

## सोमवार व शुक्रवार दोन दिवस ऑफीसमध्ये अनिवार्य : लाभार्थ्यांची रजिस्टर नोंद बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३चिखलदरा**




पंचायतसमिती, चिखलदरा येथेनुकतेच रुजू झालेले गटविकास अधिकारी कारी विनोद खेडकर यांनी पहिल्याच आठवड्यात कामकाजात शिस्त लावण्याचा कठोर निर्णय घेतला आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचित केले की, कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही.

गटविकास अधिकारी खेडकर यांनी आदेश दिले की, प्रत्येक सोमवार आणि शुक्रवार या दिवशी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहणे सक्तीचे असेल. गैरहजर राहणाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.याशिवाय, सरकारी योजनांतील लाभार्थ्यांची रजिस्टरमध्ये नोंद ठेवणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यात लाभार्थ्यांचे नाव, कोणते काम व मोबाईल क्रमाक नमूद करणे आवश्यक आहे, जेणेकरून जर संबंधित अधिकारी किवा तांत्रिक अधिकारी संबंधितलाभार्थ्यासोबत संवाद साधू शकतील व पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करता येईल.पंचायत समितीच्या कामकाजात गती,पारदर्शकता व जबाबदारी येण्यासाठी नव्या अधिकाऱ्यांनी शिस्तीचा कठोर डोस दिला असून, त्यामुळे कर्मचारी वर्गात हालचाल सुरू झाली आहे.

> चिखलदरा तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र मोठे आहे. दूर दुरून लाभार्थी येथे येतात. जर येथे येऊन त्यांचे कामे होत नसेल, तर ही मोठी गंभीर बाब आहे. त्यासाठी सोमवार व शुक्रवार अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक सहायक यांनी हजर राहून सर्व लाभार्थ्यांची कामे करावी. नाही तर दौरे दाखवून दांडी मारल्यास हयगय खपवुन घेणार नाही
>
> **विनोद खेडकर,गटविकास अधिकारी, चिखलदरा**

# जि.प. व पं.स.निवडणुकीपेक्षा गावच्याच राजकारणाला कार्यकर्त्यांची पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३चांदूरबाजार**

तालुक्यातील ग्रामपंचायतच्या ६६ सरपंचपदाचा आरक्षण कोटा जाहीर झाला. यामध्ये ३४ ग्रामपंचायतीमध्ये महिलांचा कारभार राहणार आहेतः मात्र यामुळे इच्छुक पुरुष उमेदवारांचा हिरमोड झाला असला तरी अनेक ग्रामपंचायतीची मुदत संपत असल्याने गावपुढाऱ्यानी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.



तालुक्यात काँग्रेस, भाजप, प्रहार, शिवसेना, राष्ट्रवादी यासारखे प्रमुख पक्षांनीसुद्धा आगामी निवडणुका लक्षात घेता ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित केले असल्याने गावपातळीवरील कार्यकर्त्यांना मात्र जिल्हापरिषद,पंचायत समितीच्या निवडणुकीपेक्षा ग्रामपंचायतच्या गावच्याच निवडणुकीत अधिक पसंती वाटत असल्याचे उत्साही युवकांच्या चर्चेवरून दिसून येत आहेस्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभागरचना प्रसिद्ध व ग्रामपंचायतचे सरपंच पदाची आरक्षण सोडत जाहीर झाल्याने राजकीय हालचालींना गती आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू कधी होतील, हे अजून निश्चित नसले,तरी प्रशासनाने त्यांच्या पातळीवर तयारी केली आहे. आगामी जिल्हापरिषद, पंचायत ामिती, ग्रामपंचायत निवडणुका लक्षात घेता भाजपा, काँग्रेस, शिवसेना, प्रहार, शिवसेना, राष्ट्रवादी यासारख्या प्रमुख पक्षांच्या तालुकास्तरावर मिटिंग होऊ लागल्या आहेत. याच कार्यकर्त्यांनी जनतेच्या विविध समस्येबाबत निवेदनेसुद्धा या पक्षांच्यावतीने दिली जात आहे.तालुक्यातील ग्रामपंचायतचे २०२५ ते २०३० या कालावधीतील ८ जुलैला सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होताच, इच्छुकानी राजकीय बाधणीला सुरुवात केली आहे. अनेक इच्छुक उमेदवार, संभाव्य पॅनल प्रमुख, स्थानिक नेतृत्व आपापल्या गावातील स्थिती समजून उमेदवारीसाठी तयारीला लागले असल्याचे दिसून येत आहेत, तर काहीजणांनी गाठीभेटी वाढवायला सुरुवात केली आहे. उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे. काही इच्छुक नेत्यांच्या संपर्कात राहू लागले आहेत. तालुका गाव नेत्यांकडेही गाठीभेटी सुरू झाल्या आहेत त्यामुळे ग्रामीण राजकारणात प्रचंड उत्सुकता निर्माण झाला ग्रामपंचायत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग आला आहे. सरपंचपद प्रतिष्ठेचे बनल्याने तालुका किंवा जिल्हास्तरावरील निवडणुका लढण्यापेक्षा गावच्याच राजकारणात अनेकांना रस वाटू लागला आहे.

# शेंदूरजना खुर्द ची शाळा झाली नंदनवन

## शाळेच्या बोलक्या भिंती, बोलका आवार विद्यार्थ्यांना खुणावतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३कुऱ्हा**





तिवसा तालुक्यातील शेंदूरजना खुर्द शाळा अनोख्या उपक्रमांनी सजलेली आहे. शाळा ही जणू हिरवा शालू पांघरून नटलेली आहे. शाळेतील विविध आकर्षक झाडांवर बसलेले पक्षी विद्यार्थ्यांची हितगुज साधतात. शाळेच्या बोलक्या भिंती, बोलका आवार विद्यार्थ्यांना जणू काही शाळेमध्ये येण्यासाठी खुणावत आहे.शाळेमध्ये विद्यार्थ्यांना खुले वाचन कक्ष, ग्रंथालय, संगणक कक्ष, विज्ञान कक्ष, भाषा कक्ष, स्वच्छ व शीतपेय जल सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी स्मार्ट टीव्ही, इंट्रॅक्ट बोर्ड, कराओके सिस्टीम आधी तंत्रज्ञान उपलब्ध आहे. शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वच्छव अद्ययावत शौचालय उपलब्ध आहे. विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. आदी सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांची शाळेकडे ओढ निर्माण झालेली आहे.त्यामुळे सहाजिकच शाळेचा शैक्षणिक दर्जा गुणवत्ता वाढ झालेली आहे. शाळेतील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांसाठी सदैव तत्पर असतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांमध्ये नावलौकिक मिळवलेला आहे. भारत टॅलेंट सर्च एक्झाममध्ये जिल्ह्यातून पहिला येण्याचाबहुमान या शाळेला मिळालेला आहे, तसेच यावर्षी झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. श्रीमती संजीता मोहपात्रा यांच्या संकल्पनेतून साकारलेले दिल्लीवारीसाठी शाळेतील दोन विद्यार्थिनींची निवड झालेली होती. पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध खाद्यपदार्थ तयार केले जातात. त्यामुळे विद्यार्थी पोषण आहाराचा मनसोक्त आस्वाद घेतात. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानामध्ये शाळेने विभागात दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केलेले आहे.अशी ही सुंदर शाळा निर्माण करण्यामध्ये अभिषेक कासोदे (गटविकास अधिकारी), डॉ. नितीन उंडे (गटशिक्षणाधिकारी), चंद्रशेखर रामटेके (वि. अ.शि.), सुनील बोकाडे (के प्र.) तसेच सरपंच आशिष म्गृहोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश आमले तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांचे सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे शाळेचे मुख्या. राजेंद्र होले, संजय गावंडे (वि. शि.), कु. वैशाली दिवाण (स.शि.), प्रशांत हरणे (माजी शिक्षक), विजय देशमुख (स.शि), शाळेतील विद्यार्थी, पदाधिकारी यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

# धारणी येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महा रक्तदान शिबिर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धारणी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मेळघाटातील आदिवासी भागातदेखीलहा दिवस जनसेवेत स्थांतरित करत धारणी येथे महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. आ. केवलराम काळे यांच्या नेतृत्वाखालील या शिबिराला नागरिकांनी आणि युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाया शिबिरात ७० लोकांनी रक्तदान करून जीवन वाचवण्याचा संदेश दिला. कार्यक्रमात आ. केवलराम काळे यांनी स्वतः उपस्थित राहून प्रत्येक रक्तदात्यांचे मनोबल वाढवलेः यावेळी ते म्हणाले, रक्तदान है महादान आहे. मेळघाटसारख्या दुर्गम भागात रक्ताची नेहमीच गरज असते. समाजाने पुढाकार घेतल्यानेच अशा उपक्रमांना यश मिळते.शिबिरात भाजपचे मंडळ अध्यक्ष विवेक नवलाखे, अप्पा पाटील, गजानन सुडसकर, बसी शेलुकर, दीपक मालवीय, दुर्गा बिलंदरे, मालती कास्टेकर, रामकृष्ण सोनोने, राजा पाटील, राहुल सोनोने, अंकित मोहोड,रिंकू बहनखे, उत्तम मोडक यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या शिबिराव्या यशस्वितेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यॉंर्त्यांचे मोलाचे योगदान राहिले. शिबिराची संपूर्ण व्यवस्था, प्रचार, जनजागृती आणि रक्तदात्यांचे मार्गदर्शन या सर्वच कामांमध्ये कार्यकार्त्यांनी जबाबदारीने सहभाग नोंदवला कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आ. केवलराम काळे याचे आभार मानले स्थानिक नागरिकांनी आणि युवकांनी सांगितले की, केवलराम काळे हे केवळ नेते नसून खरे जनसेवक आहेत जे प्रत्येक प्रसंग जनकल्याणाशी जोडतात. हा उपक्रम मेळघाटातील युवकांमध्ये सेवा भावना, नेतृत्वक्षमता आणि सामाजिक आनरुकतेचे प्रतीक तरल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त वरूडात 'रक्तदान'



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३वरुड**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा राज्य गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या महा रक्तदान या संकल्पनेतून संपूर्ण जिल्ह्यात मंगळवार २२ जुलै रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने वरूड मोर्शीचे भाजपा चंदू ऊर्फ उमेश यावलकर यांच्या निवासस्थानी सकाळी ११ वाजतापासून रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली होती. यावेळी आ. यावलकर यांची शिबिराला प्रमुख उपस्थिती होती. लाईफलाईन ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या शिबिराचा शुभारंभ आ यावलकर यांनी रक्तदान करुन केला.या महा रक्तदान शिबिराला भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपल्या लाडक्या नेत्याला सामाजिक जाणिवेतून शुभेच्छा दिल्या,यावेळी लाईफलाईन ब्लड ग्रुपतर्फे रक्तदात्यांना वितरण करण्यात आले, तसेच आ उमेश प्रमाणपत्र व भेटवस्तू म्हणून लंच बॉक्सचे यावलकर यांचा मोमेटो व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या रक्तदान शिबिरासाठी स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी कॅन्टीनवर बोर्डीनाला प्रकल्पाचे कार्यालय वाऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३जसापूर**




विदर्भ सिंचन विकास महामंडळमहाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम कार्यालय सहायक अभियंता श्रेणी- १ बोर्डीनाला प्रकल्प उपविभाग क्र. १ हे कार्यालय चांदूरबाजार-बेलोरा रोड पूर्णा प्रकल्प वसाहत येथे आहे. बोर्डीनाला प्रकल्प कार्यालयात बुडित क्षेत्र १८ गावांतील, लाभक्षेत्र १६ गावातील शेतकरी या कार्यालयात कामकाज संबंधाने येतात. या कार्यालयात एकूण ९ कर्मचारी कार्यरत आहे. यापैकी येथे ३ कर्मचारी नियमित हजर असतात. या कार्यालयाचा कारभार तीन कर्मचाऱ्यांवर चालतो. याकडे वरिष्ठ अधिकारी यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे.या कार्यालयात प्रभारी उपविभाग अभियंता एल. एस. मावळे हे आहे. सहायक अभियंता एस. एस. परचाके, कनिष्ठ अभियंता सुनिलपरमेश्वर, कनिष्ठ अभियंता योगेश माहुलकर, वरिष्ठ लिपिक प्रमोद खाकसे, कनिष्ठ लिपिक राजेश सोलव, राजू कुमरे, शिपाई विद्या निस्ताने, चौकीदार लहुजी वानखडे कार्यरत आहे. यापैकी कार्यालयात राजेश सोलव, राजू कुमरे, विद्या निस्ताने उपस्थित असतात. या कार्यालयातील सहायक अभियंता, कनिष्ठ अभियंता साईडवर, सि. ऑफीस अमरावती कार्यालयात आहे. हे कारण सांगून गैरहजर असतात. या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता, वरिष्ठ लिपिक प्रमोद खाकसे हे कार्यालयीन वेळेतविदर्भ सिंचन विकार महामंड महाराष्ट्र शाननाचा कार्यालय सहाय्यक अभियंता श्रेणीचोर्य सान्द्र प्रकल्प उपविभागक चांदुर बाजार चहा कॅन्टीनवर जातात त्यांना विचारले असता कुठे गेले, तर चहासाठी कॅन्टीनवर गेलो होतो. हे कार्यालय राजू सांभाळून घेतात, असे वरिष्ठ लिपिक प्रमोद खाकसे म्हणतो.कधी कार्यालयात येतात, तर कार्यालयीन वेळ संपण्याच्या पहिलेच गावाकडे जातात, तसेच कधी गैरहजर असतात यांना उपविभाग अभियता यांचा कोणताही धाक नाही. बोर्डीनाला प्रकल्प उपविभाग १ प्रभारी उपविभाग अभियंता एल. एस. मावळे याचे या कार्यालयाकडे दुर्लक्ष आहे. या कार्यालयातील दोन कर्मचारीच मुख्यालयी हजर असतात. बाकी कर्मचारी जिल्हा किंवा बाहेरील तालुक्याच्या ठिकाणी असतात, वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेवून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# मंत्रालयात नोकरीचे आमिष, १० लाखांची फसवणूक अमरावतीच्या ठकबाज महिलेसह सात जणांविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३चांदूर रेल्वे**

मंत्रालयात नोकरीचे आमिष देऊन १० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चांदूररेल्वे पोलिसांनी सात जणांविरुद्ध फसवणूकाचा गुन्हा नोंदविला आहे.

चांदूर रेल्वे वाई येथे १ एप्रिल २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ च्या दरम्यान ही घटना घडली. तक्रारदार सचिन पाटील यांना वीरेंद्र पाटील यांनी नोकरी लावून देतो, असे म्हटले व एका महिलेसोबत अमरावती येथे भेट घालून दिली. त्या महिलने सचिन पाटील याला ४ लाख रुपयांची मागणी केली. मी तुम्हाला मंत्रालयात लाख ६० हजार रूपये व त्याच्या मित्राची ७ लाख ४३ हजार रूपये असे एकूण १० लाख ३ हजार रूपयांनी फसवणूक केली.तक्रारदार सचिन महादेवराव पाटील (वय २७, रा. केळझर, ता. सेलू) यांच्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलीसांनी सुरेश ईश्वर गेडाम, ईश्वर गेडाम व दोन महिलाचौघेही रा. वाई, ता. चांदूर रेल्वे), राम घाटे (रा. पुलगाव), कदम (रा. ठाणे मुंबई) व वीरेंद्र पाटील (रा. हेलोडी, पो. सिंधी) या सातही जणांविरूध्द भादंवी कलम ४१७, ४२०, ४६५, ४६८, ४६६, ४६७, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात एपीआय शरद अहेर करीत आहे.

# खा. बोंडे यांच्या सूचनेला 'हायकोर्टाचा ब्रेक'

## अमरावती जिल्हा मजदूर सहकारी संस्थेद्वारे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

सहकारी संस्थांच्या विभागीय सहनिबंधकांनी खासदार डॉ. अनिल बाँडे यांच्या सूचनेवरून अमरावती जिल्हा मजदूर सहकारी संस्था संघांच्या हिताविरुद्ध १ जुलै २०२५ रोजी जारी केलेल्या वादग्रस्त आदेशाला व संबंधित चौकशी प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विविध प्राथमिक मुद्दे लक्षात घेता अंतरिम स्थगिती दिली. त्यामुळे बोंडे यांना जोरदार धक्का बसला आहे.

१९ एप्रिल २०२५ रोजी खा.बोंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी तक्रार करून १२० सहकारी संस्था सदस्य असलेल्या अमरावती जिल्हा मजदूर सहकारी संस्था संघांच्या संचालक मंडळाने अनेक प्रकारची अनियमितता केली आहे, असा आरोप केला होता. तसेच, संचालक मंडळ बरखास्त करून संघामध्ये प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी, अशीमागणी केली होती. त्यामुळे सहकारी संस्थांच्या विभागीय सहनिबंधकांनी २४ जून २०२५ रोजी या तक्रारीच्या चौकशीकरिता समिती स्थापन केली होती.अमरावतीमधील उपनिबंधक या समितीचे अध्यक्ष व जिल्हा विशेष लेखापरीक्षक सदस्य होते. त्यानंतर विभागीय सहनिबंधकांनी बॉडे यांच्या हस्तक्षेपामुळे १ जुलै २०२५ रोजी वादग्रस्त आदेश जारी करून नांदगाव खंडेश्वर येथील सहायक निबंधकांना समितीचे अध्यक्ष आणि अकोला येथील अतिरिक्त विशेष लेखापरीक्षकांना सदस्य केले. या आदेशाविरुद्ध मजदूर संघाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. हाआदेश मनमानी व बेकायदेशीर, अधिकारांचा दुरुपयोग करणारा आहे. बॉडे यांनी स्वतःच्या मनासारखा अहवाल तयार करून घेण्यासाठी समितीमध्ये मर्जीतील अधिकाऱ्यांचा समावेश केला, असे संघाचे म्हणणे आहे. संघाचे ११ सदस्यीय संचालक मंडळ नोव्हेंबर-२०२२ मध्ये निवडून आले असून त्याचा कार्यकाळ नोव्हेंबर-२०२७पर्यंत आहे.




### राज्य सरकारला बजावली नोटीस

न्यायालयाने राज्य सरकारच्या सहकार विभागाचे सचिव, सहकारी संस्था निबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहायक निबंधक, अतिरिक्त विशेष लेखा परीक्षक व खासदार डॉ. अनिल बोंडे यांना नोटीस बजावून याचिकेमधील आरोपांवर येत्या १४ ऑगस्टपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देशही दिले. याचिकेवर न्यायमूर्तिद्वय नितीन सांबरे व सचिन देशमुख यांच्यासमक्ष सुनावणी झाली. याचिकाकत्यांतर्फे वरिष्ठ ॲड. फिरदौस मिर्झा व ॲड. सय्यद ओवैस अहमद यांनी कामकाज पाहिले.

संघाचे काम एकदम सुव्यवस्थित पणे सुरु आहे. कोणत्याही प्रकारचा दुरुपयोग या संघात होत नाही या ठिकाणी सर्वांना समान कामे देण्यात येतात. कोणत्याच सभासदाची तक्रार संघात नाही आहे

**तनवीर साजी काझी**
**माजी अध्यक्ष जिल्हा मजदूर सहकारी संस्था**

# 'एआय'च्या मदतीन शेतात सोनं पिकणार; शेतकरी होणार स्मार्टड्रोन

## एआय चॅटबॉट, सॅटेलाइट सारखी शस्त्रे उपलब्ध होणार

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

राज्याच्या अर्थव्यवस्थेचाकणा असलेल्या शेतीला आता आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे. राज्य सरकारने 'महाग्री-एआय धोरण २०२५-२९' जाहीर केले आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हातात ड्रोन, एआय चॅटबॉट व सॅटेलाइटसारखी स्मार्ट शस्त्रे उपलब्ध होणार आहेत.

राज्यातील ॲग्रिस्टॅक, महा-ॲग्रिस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डीबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास एआय धोरणाची मदत होणार आहे. एआय चॅटबॉट्स व व्हॉइस असिस्टंट्समुळे शेतकऱ्यांना मराठीतून वैयक्तिक मार्गदर्शन मिळेल. सोप्या भाषेतील माहितीमुळे चुकीचे निर्णय टळतील, उत्पादनात सुधारणा होईल. पिकांची निवड, हवामान अंदाज, कीड,रोग नियंत्रण, बाजारभाव याबाबत अचूक सल्ला शेतकऱ्यांना वेळेवर मिळेल. वेळीच आणि अचूक सल्ला मिळाल्यामुळे नुकसान टळेल. बाजारभाव लक्षात येईल, नफा वाढेल. शेतकऱ्यांसाठी उपयुक्त अशी सिम्युलेशन टूल्स विकसित केली जातील.

### सुरुवातीला निवडक पिकांसाठी होईल सुरुवात

एआय प्लॅटफॉर्मद्वारे शेतापासून ग्राहकांपर्यंतच्या प्रवासात पिकांना दिलेली खते व औषधे, शेतीपद्धती, कापणीपश्चात प्रक्रिया व गुणवत्ता प्रमाणपत्र इत्यादी बाबींचे डिजि आणि जिओ-टॅग केलेली नोंदवही तयार केली जाईल. सुरुवातीला निवडक व निर्यातक्षम पिकांसाठी हे सुरू करून, त्याचा टप्प्याटप्प्याने अन्य पिकांपर्यंत विस्तार केला जाईल.



पेरणीपूर्वीच संभाव्य जोखीम, खर्च, उत्पादनाचा अंदाज व पर्यायी पद्धती समजतील. शेतापासून ग्राहकापर्यंतच्या प्रवासात पिकांना दिलेली खते व औषधे, शेतीपद्धती, प्रक्रिया व गुणवत्ता प्रमाणपत्र इत्यादी बाबींचे डिजिटल आणि जिओ-टॅग केलेली नोंदवही याद्वारे तयार होईल, असे फायदे एआयचे असणार आहेत.अन्नसुरक्षा, पुरवठा साखळीतील पारदर्शकता, अन्न गुणवत्ता हमी आणि शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळावी, यासाठी एआय, ब्लॉकचेन आणि क्यूआर-कोड तंत्रज्ञानावर आधारित राज्यव्यापी शोध क्षमता व गुणवत्ता प्रमाणीकरण प्लॅटफॉर्म उभारण्यात येईल.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा M-8605948853

# धारणी अकोट मार्गावर दरड कोसळली

## एसटी बस सह खाजगी वाहने अडकली : वाहनातील प्रवाशांनीच केला रस्ता मोकळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३धारणी**

धारणी बिजूधावडी मार्गे व हरीसाल चिखली मार्गे अकोला जिल्ह्यातील अकोट येथे जाणारा महामार्ग हा जंगल पहाड भागातून खोंगडा फाट्यावरून दोन वेगवेगळ्या मार्गे परसापुर व अकोट असा व ९० किलोमीटर चा प्रवास करत जावे लागते सोमवारी मध्यरात्री जंगलात मुसळधार पाऊस पडल्याने वनविभागाच्या कोहानाक्यापासून तर बेलकूंड रेस्ट हाऊस रस्त्यादरम्यान पहाडा वरील दरड व मोठे दगड पडल्याने रस्ता काही तास बंद होऊनवाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला होता त्यामुळे त्या रस्त्यावरील एसटी महामंडळाची बस सह खाजगी वाहने यांचा प्रवास थांबला त्या बस व खाजगी वाहनातील प्रवाशांनी स्वतः रस्त्यावरील मोठमोठी दगडे व मुरूम स्वता साफ करून प्रवास केला त्यामुळे नागरिकांनो सावधान या रस्त्याने प्रवास करायचा असेल तर खात्री करूनच प्रवास करावा.




धारणी वरून अकोट व परसापूर जाणाऱ्या हा महामार्ग खाली डांबरीकरणाच्या रस्ता वर पहाड झाडे ,झुडपे ,आहे सोमवारी मध्यरात्री दरम्यान मेळघाटातील जंगल भागात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाल्याने या रस्त्याच्या वर असलेले मोठ मोठ्या दरड वनविभागाच्या कोहां फाटा ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेलकुंड रेस्ट हाऊस दरम्यान रस्त्यावर कोसळल्या त्यामुळे रस्त्यावर मोठे दगड व मोठ्या प्रमाणात मुरूम पडला होता मंगळवारलाधारणीवरून सकाळी आठ वाजता खोंगडा मार्गे परसापूर व अकोट कडे जाणारी एसटी महामंडळाची बस व खाजगी वाहनांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण झाला त्यामुळे प्रवास करत असलेल्या बसमधील व खाजगी वाहनातील प्रवाशांनी स्वतः वाहनातून खाली उतरून रस्ता मोकळा केला त्यानंतर वाहतुकीस रस्ता मोकळा झाला त्यासाठी नागरिकांना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागली त्यामुळे आता या रस्त्याने प्रवास करणाऱ्या नागरिकांना सावधान कधीही दरड कोसळून रस्ता बंद होण्याची शक्यता असल्याने या मार्गाने प्रवास करताना रस्ता मोकळा आहे किंवा नाही याबाबत खात्री करूनच प्रवास करन्याचा संदेश अडकलेल्या प्रवाशानी इतर प्रवाशांना दिला आहे.

# ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहणार

## येत्या २४ तासात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नागपूर**

राज्यातील बहुतांश भागांमध्ये पाऊस पुन्हा एकदा सक्रीय झाला आहे. एकीकडे मुंबई, कोकणात पावसाने धुमाकूळ घातला असतानाच विदर्भातील वाशिम, बुलढाणा, अकोला या शहरांमध्ये देखील पावसाने धुमाकूळ घातला आहे. अशातच आता पुन्हा एक नवा इशारा पावसाने दिला आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या २४ तासात शहरासह राज्याच्या बहुतांश भागात पाऊस हजेरी लावणार आहे.



तर मुंबई शहर आणि उपनगरांसह, पालघर, रायगड, रत्नागिरी, ठाणे या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात बुधवारी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर, उर्वरीत भागात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

२७ जुलैपर्यंत हेच वातावरण कायम असणार आहे. कोकणातील अंतर्गत भाग आणि उत्तर कोकणामध्ये मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची हजेरी असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर, ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहतील. कोकणाचा दक्षिण भाग आणि गोव्याच्या किनारपट्टीवरही पावसाचा जोर वाझणार असून, दक्षिण मध्य महाराष्ट्रालाही पावसाच्या जोरदार सरी झोडपणार आहेत. यादरम्यान घाटमाथ्यावरही जोरदार पावसाची हजेरी असेल.भारतीय हवामान खात्याने नागपूर जिल्ह्यामध्ये २२ ते २६ जुलैपर्यंत जिल्ह्यात मुसळधार पाऊस, वादळीवारा, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवली आहे. २३, २४ व २६ जुलैला येलो अलर्ट तर २५ जुलैला 'ऑरेंज अलर्ट' दिला असुन या कालावधीमध्ये काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे.

या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. विजगर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे आवश्यक आहे. अशा कालावधीमध्ये भ्रमणध्वनी सोबत बाळगू नये. विजगर्जना सुरू असताना घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावी. पाऊस व विज गर्जना होत असताना चुकूनही झाडाच्या खाली उभे राहू नये व शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप खांडे यांनी केले आहे.

# हेलिकॉप्टर गरगरले! उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, 'प्रयत्न कर', पायलट म्हणाला, 'अंगलट येईल'



**विदर्भ प्रजसत्ताक दि.२३वर्धा**

वर्धा येथील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन चांगलेच चर्चेत आले. ते स्वतः म्हणून गेले की एका तासात मी दोनदा वर्ध्यात येऊन गेलो. कार्यक्रम होता वर्धा जिल्हा मोतीबिंदूमुक्त अभियान शिबिराचा. पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन सेवाग्राम येथील चरखा सभागृहात केले होते. यावेळी मंत्री संजय राठोड व प्रकाश आबीटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. दुपारी १२ वाजता असलेला हा कार्यक्रम विजेचा कडकडाट व मुसळधार पावसामुळे तब्बल अडिच तास उशीरा सूरू झाला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अखेर व्यासपीठावर आगमन झाले आणि आयोजकांनी सुटकेचा निश्वास सोडला. शिंदे हे एकदा वर्ध्यात येऊन गेले, या संदर्भाचा धागा जोडत आपल्या भाषणाच्या प्रारंभीच ते म्हणाले, अरे मी आत्ताच दोनदा येऊन हॅलो केले. त्याची उकल करताना शिंदे म्हणाले, निघतांना पावसास सुरवात झाली. कार्यक्रमस्थळी येताच पाऊस जोरात. हेलिपॅड दिसेना. गोंधळ झाला. पायलट म्हणाला आता उतरणे कठीणच. खाली काही दिसत नाही. परत फिरावे लागणार.

तेंव्हा उपमुख्यमंत्री शिंदे धीर देत पायलटला म्हणाले, प्रयत्न तर करून बघ. तर पायलट म्हणतो, प्रयत्न अंगलट येवू शकतो. परत गेलेलेच बरे. मग शिंदे स्वार असलेले हेलिकॅप्टर नागपूर साठी माघारी फिरले. खाली आयोजक हिरमुसले. नागपुरात पोहचताच शिंदे यांना परत बाय रोड येण्याची विनंती करण्यात आली. केवळ चेहरा दाखविण्यास तरी वर्ध्यात या. या विनंतीस मान देत उपमुख्यमंत्री शिंदे बाय कार समृद्धीमार्गे कार्यक्रमस्थळी पोहचलेच. स्वतः त्यांनी हा घटनाक्रम भाषणातून सांगितला.

# अपंग कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करणारी टोळी जिल्ह्यात सक्रिय

## अंजनगाव पोलीस स्टेशनमध्ये ब्लॅकमेल करणाऱ्या तीन महिलांवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अंजनगाव सुर्जी**

अमरावती जिल्ह्यात अपंग कर्मचाऱ्यांना टार्गेट करुन आपले अपंग प्रमाणपत्र खोटे असून आपल्यावर कारवाई करण्याच्या धमक्या देऊन अपंग कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करत असल्याची घटना अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली. अंजनगाव सुर्जी नगरपरिषद आरोग्य विभागात कार्यरत असलेली महिला कर्मचारी दिनांक २० रोजी आपल्या कार्यालयात कर्तव्यावर असतात तीन महिला अपंग संघटनेच्या आम्ही कार्यकर्त्या असुन तुमच्या अपंग असलेल्या पायांची तपासणी करण्यासाठी आले आहो असे म्हणून तीन्ही महिलांनी अपंग असलेल्या महिलेच्या पायांची तपासणी केली. आपले अपंग प्रमाणपत्र खोटे असून आपल्याला आमच्या सोबत आरोग्य उपसंचालक अकोला येथे तपासणी करण्यासाठी चालायचे आहे.



आमच्या सोबत नाही आल्यास तुमची तक्रार करणार आहे जर वीस हजार दिल्यास प्रकरण येथेच थांबवून देऊ. असे करुन अपंग महिला कर्मचारीला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला असता महिला कर्मचारी यांनी ११२ वर फोन करुन पोलीसांना बोलावण्यात आले होते मात्र पोलीसान सोबत हुज्जत बाजी करून तीन्ही महिलांनी नगरपरिषद कार्यालयातुन पलायन केले. नगरपरिषद आरोग्य विभागातील अपंग महिला कर्मचारी यांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी कांचन कुकडे , धनश्री पटोकार, इतर एका महिलांसह एकुण तीन्ही महिलांवर गुन्हे दाखल केले असून पुढील तपास अंजनगाव सुर्जी पोलीस करत आहे

**अनेक कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल केल्याची शक्यता**

अपंग संघटनेच्या नावावर बोगस अपंग मोहिम राबवूनशासकीय नोकरीत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल केल्याची शक्यता नाकारता येत नसुन या संघटनेला कोणी अपंग प्रमाणपत्र तपासणीचे अधिकार दिले व यांचा मुख्य सुत्रधार कोण हा शोध पोलीसानी घेणे गरजेचे असुन या अपंग संघटनेची नोंद तपासून कारवाईची मागणी होत आहे.

# अमरावती महानगरपालिका अंतर्गत 'मिशन फुटपाथ फ्रीडम' अंतर्गत अतिक्रमणावर मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार 'मिशन फुटपाथ फ्रीडम' अभियानांतर्गत झोन क्रमांक ३ दस्तुरनगर अंतर्गत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली.

ही कारवाई सकाळी ११:३० वाजता सुरू करण्यात आली. एस.आर.पी.एफ. कॅम्प रोड वडाळी गार्डनपासून ते चपराशीपुरा येथील मोठी मस्जिद, अब्राज हॉटेल, जजिरा हॉटेल व सुंदरलाल चौकापर्यंतच्या परिसरात फुटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांवर ही मोहीम राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान चहा कॅन्टीन, मटन व मास विक्रीची दुकाने, लोखंडी खोके तसेच फुटपाथवर वाढवलेले शेड व ओटे हटविण्यात आले. त्यामुळे या परिसरातील पादचाऱ्यांना आता मोकळा व सुरक्षित मार्ग मिळणार आहे.

ही कारवाई सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, निरीक्षक श्री शाहेबान यांच्यासह पोलीस आयुक्त कार्यालयाच्या सहकार्याने पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात आला होता. अतिक्रमण विभागाचे कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.